रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ ◆ अंक ३५१
www.ramprahar.com
मंगळवार ८ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

ज्येष्ठ नागरिकाला तबल ७३ लाख ७२ हजारांना गंडा/२
अर्ध्याहून अधिक भातशेती रूजलीच नाही!/५
शुभांगी घुलेची आता रौप्यपदकाला गवसणी/८

## आयसीसीच्या सीईओपदी भारताचे संजोग गुप्ता



**दुबई :** जागतिक स्तरावर भारतीय क्रिकेटचे नाव हळूहळू मोठे होत आहे. सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) चेअरमनपदावर भारतीय व्यक्ती विराजमान आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) माजी सचिव जय शाह यांना तो बहुमान मिळाला आहे. तशातच आता आयसीसीने संजोग गुप्ता यांना त्यांचे नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्त केले आहे. गुप्ता यांनी सोमवारी म्हणजेच ७ जुलैपासून ही जबाबदारी स्वीकारली. त्यांनी ऑस्ट्रेलियाचे जेफ ॲलार्डिस यांची जागा घेतली, जे २०२१पासून या पदावर होते. संजोग हे आयसीसीचे सातवे सीईओ आहेत आणि मनु साहनी यांच्यानंतर ही जबाबदारी स्वीकारणारे ते दुसरे भारतीय ठरले. नामांकन समितीने एकमताने संजोग यांची शिफारस केली.

# राज्यात रिक्त पदांसाठी लवकरच मेगा भरती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम (रिक्रुटमेंट रूल) सुधारित करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे आदी उद्दिष्टे दिली गेली आहेत. या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन मेगा भरती करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६,८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहे, मात्र त्यांना २० वर्ष किंवा त्यापेक्षा



जास्त कालावधी झालेला आहे अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदांवर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही, पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील. अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही.

अधिसंख्य असलेली सहा हजार ८६० पदे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भरती करण्याकरिता रिक्त झालेली आहे. त्यापैकी १३४३ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ब्लॉक चेन पद्धतीवर अभिलेख आणण्याबाबत शासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी करताना कागदपत्रे तपासणे सोयीचे होईल तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सक्षम करण्यात येत आहे. अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत सचिवांचा गट तयार करण्यात येईल. या गटाच्या माध्यमातून अभ्यास करून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माहिती देताना पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने सफाई कामगारांची पदे वारसा हक्काने भरण्याबाबत असलेली स्थगिती उठवलेली आहे. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ही पदे वारसा हक्काने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या पदांसाठीही भरतीही करण्यात येणार आहे.

## कोर्लई समुद्रात संशयित बोटीची चर्चा; निघाला बोया

**अलिबाग, रेवदंडा, मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत असणाऱ्या कोर्लई समुद्र किनाऱ्यापासून तीन नॉटिकल मैल अंतरावर एक संशयित बोट बोट उभी असल्याची माहिती तटरक्षक दलाने रायगड पोलिसांना दिली. त्यानंतर या संशयित बोटीचा शोध नौदल, तटरक्षक दल आणि पोलीस शोध घेत होते, मात्र ती बोट नसून मासेमारी जाळीचा बोया असल्याचे निष्पन्न झाले.

मुरूड तालुक्यातील कोर्लईजवळ समुद्रात एक बोट रविवारी रात्री संशयास्पदरित्या असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे नौदल, तटरक्षक दल, मेरीटाईम बोर्ड, रायगड पोलीस, महसूल विभाग सर्वच यंत्रणा कामाला लागली.

रात्री कोर्लईच्या दीपगृहाजवळ मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. वाहनांची कसून तपासणी सुरू झाली. मच्छीमार सहकारी संस्थांच्या बैठका घेऊन स्थानिकांनाही सतर्क करण्यात आले. तटरक्षक दलाची गस्त वाढवण्यात आली. सकाळी तटरक्षक दलाच्या हेलिकॉटरने पाहणी केली. ड्रोनच्या माध्यमातूनदेखील पाहणी करण्यात आली, पण बोट सापडली नाही.

यंत्रणा शोध घेत असताना खोल समुद्रात दिवे चमकताना दिसत होते. त्यामुळे संशय बळावला. ही बोट असावी असा तर्क काहींनी लावला, मात्र कसून शोध घेतला असता तो तरंगता बोया असल्याचे निष्पन्न झाले. यापूर्वी अशा प्रकारचा बोया गुजरातमध्ये आढळून आला होता, असे पोलिसांनी सांगितले.

**मुरूड तालुक्यातील कोर्लईजवळ एक संशयास्पद बोट असल्याचा संदेश रात्री दिल्ली येथील तटरक्षक दलाच्या कार्यालयाकडून आला होता. त्यानुसार रायगड पोलिसांसह सर्व सागरी सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. रात्रीपासूनच शोध मोहीम हाती घेण्यात आली. नाकाबंदी करण्यात आली. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.**
**-आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

### अफवांना उधाण

संशयित बोट पाकिस्तानी असून त्यातून काही नागरिक उतरले असल्याने कोम्बिंग ऑपरेशन सुरू करण्यात आल्याचे सांगितले गेले. तपास सुरू असता नागाव परिसरात पाच पर्यटकांना संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. चौकशी केली असता ते पनवेल येथील रहिवासी असून फिरण्यासाठी आल्याचे स्पष्ट झाले.

## महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना

### पुण्यातील घटना; माथेफिरू ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे रेल्वेस्थानकाबाहेर असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुतळ्याची एका माथेफिरू तरुणाने विटंबना केल्याची घटना रविवारी रात्री घडली. पोलिसांनी आरोपी सुरज शुक्ला याला ताब्यात घेतले आहे.

सुरज शुक्ला हातात कोयता घेऊन या ठिकाणी आला. त्याने केशरी रंगाचा कुर्ता घातला होता. सुरज हा महात्मा गांधींचा पुतळा असलेल्या चौथऱ्यावर चढला आणि त्याने पुतळ्यावर कोयत्याने वार करायला सुरुवात केली. हा प्रकार प्रवाशांनी पाहिल्यानंतर त्यांनी रेल्वे पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी तातडीने सुरज याला चौथऱ्यावरुन खाली उतरवून ताब्यात घेतले. सुरजने तोपर्यंत गांधीजींच्या पुतळ्याच्या छातीवर आणि पायाने कोयत्याने वार केले होते. त्याला पुतळ्याचे डोके कोयत्याने तोडायचे होते, मात्र त्यापूर्वीच रेल्वे पोलिसांनी सुरजला ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला.

प्राथमिक माहितीनुसार सुरज शुक्ला हा मूळचा उत्तर प्रदेशातील वाराणसीचा आहे. तो नोकरीसाठी पुण्यात आला होता.

## आदिवासींच्या बाधित घरांचा सर्वे करून अहवाल सादर करा -मंत्री डॉ. अशोक उईके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडेजवळील वडघर ग्रामपंचायत हद्दीतील फणसवाडी येथील आदिवासींच्या घरांवर सिडकोने तोडक कारवाई केली होती. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सोमवारी (दि. ७) राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांची भेट घेऊन आदिवासींची कैफियत मांडली. या वेळी मंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत सिडको हद्दीत आदिवासींची किती बाधित घरे आहेत याचा सर्वे करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.





सिडकोच्या जागेवर असलेल्या फणसवाडीत आदिवासींची ३२ घरे होती. कॉलेजकडे किंवा विमानतळाच्या पुनर्वसनाच्या वसाहतीकडे जाणारा जो मार्ग आहे त्यावरचा क्रॉसिंग रोड बंद करून रेल्वेला बनवलेल्या डक्टमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्या रस्त्यातील १२ घरे पुनर्वसनाचे कुठलेही आश्वासन न देता सिडकोकडून एप्रिल महिन्यात निष्कासित करण्यात आली. **(पान २ वर..)**

## निवडक

### पाकिस्तानी सैन्याचा एजंट असल्याची तहव्वूर राणाची कबुली

**नवी दिल्ली :** मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असलेला तहव्वूर राणा सध्या दिल्लीतील तिहार तरूंगात असून त्याची राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येत आहे. राणाने मी पाकिस्तानी सैन्याचा विश्वासू एजंट होतो, अशी कबुली दिल्याचे वृत्त सूत्रांच्या हवाल्याने माध्यमांनी दिले आहे. त्याचप्रमाणे तो आणि त्याचा सहकारी डेव्हिड कोलमन हेडलीने पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबा दहशतवादी संघटनेबरोबर अनेक प्रशिक्षण सत्रे घेतली होती, असेही सांगितले.

### हिमाचल प्रदेशमधील मृतांचा आकडा ७८वर, ३७ जण बेपत्ता

**मंडी :** हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस, नद्यांना आलेला पूर व दरड कोसळून आतापर्यंत ७८ लोकांचा जीव गेला आहे, तर ३७ जण बेपत्ता आहेत. यासह ११५ जण जखमी असून त्यांच्यावर उपचार चालू आहे.

## अंबरनाथमध्ये धावत्या स्कूल व्हॅनमधून पडून दोन मुले जखमी

### चालकासह दोन मदतनीस महिलांवर गुन्हा दाखल

**अंबरनाथ : प्रतिनिधी**

अंबरनाथमध्ये धावत्या स्कूल व्हॅनमधून पडून दोन लहान मुले जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि. ७) घडली. यात दोन लहान मुले जखमी झाली आहेत. या प्रकरणी वाहनचालकासह दोन मदतनीस महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

अंबरनाथच्या फातिमा शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन सोमवारी एक खासगी व्हॅन विमको नाक्याच्या दिशेने जात होती. नेताजी मार्केट परिसरात अचानक भरधाव व्हॅनच्या मागचा दरवाडा उघडला आणि त्यातून नर्सरीचे दोन विद्यार्थी थेट रस्त्यावर पडले. धक्कादायक बाब म्हणजे या व्हॅनचालकाच्या हा प्रकार लक्षातही



आला नाही. त्याने तशीच व्हॅन चालवून तेथून निघून गेला. रस्त्यावर मागून येणाऱ्या एका रिक्षाचालकाने हा अपघात पाहून रिक्षा थांबवली. यानंतर गंभीर जखमी झालेल्या या विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेत त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या घटनेत मुलांच्या डोक्याला मार लागला असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणात शाळेची भूमिकाही तपासली जाणार आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.




**पनवेल : नवीन पनवेल येथील नील हॉस्पिटलच्या वतीने नव्याने बांधण्यात आलेल्या सर्वधर्म प्रार्थना तथा मेडिटेशन स्थानाचे उद्घाटन रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, डॉ. गिरीश गुणे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, डॉ. शुभदा नील, डॉ. निलेश भाटिया, स्वराज मोरे, प्रभात सीना, पंढरीनाथ नील, मंगला गडमुले आदी उपस्थित होते. तुम्ही स्वतः मनातून खुश राहण्याचा प्रयत्न करा. आजार तुमच्या जवळ येण्याचा प्रयत्न करणार नाही, असे मत या वेळी व्यक्त करत या कार्यक्रमाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले.**

## नवी मुंबई विमानतळ सप्टेंबरअखेर कार्यान्वित होईल -मंत्री उदय सामंत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई विमानतळावर प्रवाशांचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे मुंबई विमानतळाला पर्याय म्हणून नवी मुंबई विमानतळ उभारण्यात येत आहे. हे विमानतळ नेमके कधी सुरू होणार? याबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. मंत्री उदय सामंत यांनी या संदर्भात विधानसभेत माहिती देत सप्टेंबरअखेर हे विमानतळ कार्यान्वित होईल, असे सांगितले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ११६० हेक्टर परिसरात उभारण्यात येत आहे. विमानतळाचा रनवे ३.७ किमी इतका लांब असून एकाचवेळी ३५० विमाने उभी राहू शकतात इतकी या विमानतळाची क्षमता आहे. हे विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर वर्षाला नऊ कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करू शकतात.

भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे असलेले नवी मुंबई



विमानतळ प्रमुख शहरांशी जोडले जाणार आहे. या विमानतळाला मेट्रो, लोकल, बस आणि खासगी वाहनांसोबतही जोडण्यात येईल तसेच मुंबईवरून नवी मुंबई विमानतळ गाठण्यासाठी वॉटर टॅक्सीचा विचारही करण्यात येत आहे. नवी मुंबई विमानतळावरून पहिल्या दिवसापासून १५पेक्षा जास्त शहरांमध्ये १८ दैनंदिन उड्डाणे (३६ एअर ट्राफिक मॅनेजमेंट) सुरू केली जाणार आहेत, तर नोव्हेंबरपर्यंत ७९ दैनंदिन उड्डाणे (१५८ एअर ट्राफिक मॅनेजमेंट) होणार आहेत. यामध्ये १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश आहे.

## बोरघाटात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाटात अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्री घडली. बोरघाट परिसर आणि गारमाळच्या घनदाट जंगलात जंगली प्राणी आहेत. बोरघाटात रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाची जोरदार धडक बसल्याने बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, खोपोली वनविभागाचे अधिकारी नितीन कराडे व स्टाफ, खोपोली पोलीस, हेल्प फाऊंडेशन सदस्य आदी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी पाहणी करून पुढील कार्यवाही केली.

## लाचप्रकरणी श्रीवर्धन महसूल सहाय्यकाविरुद्ध कारवाई

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक विकास मनोहर बोंडले (वय ३४) यांनी शेतकऱ्याच्या सातबारा उताऱ्यावर नाव नोंदणीसाठी १५ हजार रुपये लाच मागितल्याचा आरोप उघड झाला आहे.



याबाबत २९ वर्षीय तक्रारदार शेतकऱ्याने २४ जून रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई कार्यालयात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार महसूल सहाय्यक बोंडले यांनी प्रलंबित काम करून देण्यासाठी पैशांची मागणी केली होती. या तक्रारीनंतर २६ जून रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यात महसूल सहाय्यकाने लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्याच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया श्रीवर्धन पोलीस ठाण्यात सुरू करण्यात आली आहे.

१०० राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
शताब्दी वर्ष

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ... स्वातंत्र्यपूर्व काळात २७ सप्टेंबर १९२५ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेली संघटना. रा. स्व. संघाला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या कालखंडात तावून-सुलाखून निघालेल्या या संघटनेने अनेक चढउतार पाहिले आहेत. संघाच्या या दीर्घ वाटचालीची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त लेखमाला सुरू करीत आहोत. गुरूपौर्णिमेला म्हणजे गुरूवार, १० जुलै २०२५ रोजी या लेखमालेतील पहिला लेख प्रसिद्ध होईल. त्यानंतर दर रविवारी पुढील लेख प्रकाशित केले जातील.

-मुख्य संपादक

# प्राधान्य कुटुंब व अंत्योदय योजनेतून १० लाखांहून अधिक लाभार्थ्यांना धान्य

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात प्राधान्य कुटुंब योजना आणि अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत १० लाखांहूनअधिक लाभार्थ्यांना लाभ झाला असून प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सध्या १,८६,०१३ शिधापत्रिकांवर७,७७,४५७ लाभार्थी आहेत, तर अंत्योदय अन्न योजनेत ६६,७३४ शिधापत्रिकांवर २,४८,९१६ लाभार्थीलाभ घेत असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनीविधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य देवराव भोंगळे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य नाना



पटोले,प्रशांत ठाकूर यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले, धान्य वितरणाची प्रक्रिया ई-पॉस मशीनद्वारे पार पाडली जात असून, अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मे महिन्यातील वितरणप्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित प्रकरणाची चौकशीकरण्यात येईल.

तसेच, केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे तिथे व्हिटॅमिनयुक्त(फोर्टिफाइड) तांदूळ पुरविण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील गरजू व गरिबांना वेळेवरआणि योग्य दर्जाचे अन्नधान्य मिळावे यासाठी शासन कटिबद्ध असून, या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जात असल्याचे यावेळी मंत्री भुजबळ यांनी प्रश्नाचे उत्तर देतांना सांगितले.

# ज्येष्ठ नागरिकाची डेटिंग ॲपद्वारे फसवणूक
## तब्बल ७३ लाख ७२ हजारांना घातला गंडा; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

डेटिंग ॲपद्वारे अनोळखी महिलेसोबत मैत्री करणे नवीन पनवेल भागात राहणार्या एका ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला चांगलेच भोवले. या ज्येष्ठ नागरिकाशी डेटिंग ॲपद्वारे मैत्री केल्यानंतर संबंधित महिलेने त्यांच्याशी प्रेमाचे नाटक करत त्यांना गोल्ड ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवण्यास सांगत तब्बल ७३ लाख ७२ हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात महिलेविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या ज्येष्ठ नागरिकाने मार्च २०२४ मध्ये त्यांच्या मोबाईलमध्ये बम्बल नावाच्या डेटिंग ॲपवर सर्चिंग सुरू केले होते. त्यातून झिया नावाच्या महिलेशी त्यांची ओळख झाली. त्यानंतर झियाने त्यांच्यासोबत व्हॉट्सॲप चॅटिंगद्वारे तसेच व्हॉट्सॲपवर कॉल करून मैत्री केली. तसेच त्यांना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून विश्वास संपादन केला. त्यानंतर तिने गोल्ड ट्रेडिंगची माहिती देत त्यात गुंतवणूक केल्यास भरपूर नफा होईल, असे सांगितले. त्यावर त्यांनी सुरुवातीला २५ हजार रुपयांची गुंतवणूक केली. त्याबदल्यात त्यांना ३५६० रुपयांचा नफा झाला. हे पाहून ते गोल्ड ट्रेडिंगमध्ये मोठी रक्कम गुंतवू लागले. त्यानंतर झियाने ट्रेडिंग प्लॅटफॉर्ममध्ये पैसे गुंतवणुकीतून जो फायदा होईल त्यामधून




तिच्यासोबत भागीदारीत सौंदर्यप्रसाधन निर्मिती कंपनी स्थापन करण्याची इच्छा व्यक्ती केली. त्यानुसार त्यांनी या ट्रेडिंग फ्लॅटफॉर्ममध्ये ५८ लाख रुपये गुंतवले असता त्यांना दोन कोटींचा नफा झाल्याचे भासवण्यात आले, मात्र, ही रक्कम काढण्यासाठी त्यांना ४४ लाख ४० हजार रुपयांचा कर भरावा लागेल, असे सांगण्यात आले.

एवढी मोठी रक्कम भरणे शक्य होणार नाही, असे त्यांनी सांगितले असता झियाने त्यांना एक कोटीसाठी २२ लाख रुपये कर भरावे लागतील, असे सांगत आठ लाख रुपयांचा कर त्यांच्या नावाने भरल्याचे या ॲपवर दाखवले. त्यावर त्यांनी १४ लाख २० रुपये भरले, मात्र त्यांनी यांच्या नफ्यातील एक कोटीची मागणी केली असता, ट्रेडिंग फ्लॅटफॉर्मची साईट बदलल्याचे तसेच त्यांचे नियम बदलल्याचे सांगत दोन कोटीच्या नफ्यासाठी त्यांना उर्वरित २२ लाख २० हजार रुपये भरावे लागतील, असे झियाने त्यांना सांगितले. दरम्यान, या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## साडेपाचशेहून अधिक व्यक्तींची हृदय तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

व्हाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्यावतीने नवी मुंबईत आजपर्यंतची सर्वात मोठी हृदय तपासणी मोहीम राबवण्यात आली. या व्यापक आरोग्य उपक्रमात नवी मुंबई, रायगड, मुंबई, कल्याण, डोंबिवली व आसपासच्या भागांतील ५५० हून अधिक प्रौढांची मोफत तपासणी करण्यात आली.

या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांविषयी जनजागृती करणे, तसेच जोखीम असलेल्या रुग्णांचे लवकर निदान व वेळेवर उपचार यासाठी योग्य मार्गदर्शन करणे हे होते. हृदयरोग हे भारतात मृत्यूचे एक मुख्य कारण असल्याने, अशा प्रकारची शिबिरे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात, असे हॉस्पिटलचे वरिष्ठ हृदयरोगतज्ञ डॉ. अनुज साठे यांनी सांगितले. अशा प्रकारची शिबिरे, हृदयरोगासारखे आजारपण जडलेल्या व्यक्तींची लवकर ओळख पटवण्यास मदत करतात व त्यांच्यावर वेळेवर उपचार होऊन गंभीर गुंतागुंती पासून त्यांचा बचाव करता येतो.

# माणगावमध्ये आकांक्षी शौचालयाचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाकडून प्रोत्साहनात्मक निधी दिला जातो. त्या अंतर्गत माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये आकांक्षी शौचालय उभारणीच्या कामासाठी रु. ६४,०८,२९९/- इतका निधी मंजूर झाला असून या कामाचे भूमिपूजन शिवसेना प्रवक्ते ॲड . राजीव साबळे यांच्या हस्ते झाले .

माणगाव या महत्त्वाच्या मध्यवर्ती शहराच्या ठिकाणी शौचालयाची कोणतीही सोय नव्हती. विशेषता महिलांना या समस्येला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे माणगावचे नव्हे तर ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांकडून या ठिकाणी नगरपंचायतीने शौचालय उभारावे अशी मागणी होत होती. या मागणीचा विचार करून नगरपंचायतीने आकांक्षी शौचालय उभारण्याचा निर्णय घेतला असून त्याचे भूमिपूजन पार



पडले त्यामुळे लवकरच नागरिकांची सोय होणार आहे.

माणगाव नगरपंचायत ही सातत्याने स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारी संस्था असून, या आकांक्षी शौचालय प्रकल्पामुळे नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार शौचालय सुविधा मिळणार आहेत. भूमिपूजन प्रसंगी ॲड. राजीव साबळे म्हणाले की, स्वच्छता ही केवळ मोहीम नसून नागरिकांचे जीवनमान उंचावणारी जबाबदारी आहे. हा प्रकल्प माणगावच्या शहर विकासात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, सदर काम ठेकेदाराकडून निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी नगरपंचायत कटिबद्ध आहेत. हा प्रकल्प केवळ सुविधा नव्हे, तर माणगाव शहराची स्वच्छतेकडे वाटचाल अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल. माणगाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी नगरसेवक व प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

# रोहा सिटीझन फोरमचे शिबिर; ३१ मोतीबिंदू रुग्णांना नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी ९७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३१ रुग्णांच्या लगेचच आर झुनझुनवाला, शंकरा आय हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. श्री धावीर मंदीर भक्त निवासात झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. शंकरा आय हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. गेल्या तीन वर्षांतील सलग ३९ वे शिबिर पार पडले. रोहा सिटिझन फोरमने शिबिराच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ३५०० हून अधिक नेत्र रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया केल्याने तपासणी साठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.



रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, मिलिंद अष्टिवकर, श्रीकांत ओक, अहमद दर्जी, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, संतोष खटावकर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, बिलाल मोर्बेकर, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, भावेश अग्रवाल आदी फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आभार मानले.

## साई शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**माणगाव : बातमीदार**

'शाळेला चाललो आम्ही 'या शैक्षणिक साहित्य वाटप २०२५ अभियाना अंतर्गत गवळी समाज सेवा संघ महाराष्ट्र रायगड शाखा यांचे मार्फत साई मधील रा. जि. प. शाळा मराठी व रा. जि. प. शाळा आदिवासी वाडी साई येथे इयत्ता १ ते ५ वी च्या विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी साई ग्रामपंचायतीच्या सरपंच हवाबी राहटवीलकर , ग्रामपंचायत सदस्या रेशमा अधिकारी, गवळी समाज सेवा संघ महाराष्ट्र रायगड शाखेचे अध्यक्ष आंनद डाकरे, उपाध्यक्ष अनिल काठेकर, कार्याध्यक्ष सुदर्शन किन्होळकर, सचिव तुशांत पवार, जय खेडेकर, मनोज खेडेकर, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख तेजर महागावकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम प्रसंगी रा. जि. प शाळा मराठी व आदिवावाडी साई येथील इयत्ता१ ते ५ वी च्या विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप मान्यवारांच्या हस्ते देण्यात आले. जगूया थोड समाजाच्या उन्नती साठी, करूया मदत समाज हितासाठी अशी भावना मनात ठेवून गवळी समाज सेवा संघ महाराष्ट्र रायगड शाखेच्या वतीने आपण समाजाचे काहीतरी देणेकारी आहोत ही भावना असणारी इच्छा याचीच पूर्तता म्हणून आज साहित्याचे वाटप शाळेत करण्यात आले.



# रोहा उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटरचे मंत्री आदिती तटकरेंच्या हस्ते लोकार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा उपजिल्हा रुग्णालयात येथे डायलिसिस सेंटरचे लोकार्पण महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रोहा उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ सचिन गोमसाळे, अलिबाग येथील निवासी वैद्यकीय अधिकारी, डॉ.किरण शिंदे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, गटनेते महेंद्र गुजर, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, समिर सकपाळ, मयुर दिवेकर, चंद्रकांत पार्टे, निलेश शिर्के, स्वरांजली शिर्के, मानसी दाते, प्रितम पाटील, रवी चाळके, वसंत कोठारी, डॉ सलमा मुजावर आदी उपस्थि होते.



यावेळी महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी डायलिसिस सेवा येथे सुरू व्हावे अशी मागणी रोहेकरांची होती.रोह्यात आज दोन मशीन उपलब्ध झाले आहेत. रोह्यात डायलिसिस सेवा सुरु होत आहे. आजुन एक मशीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार आहोत. नुकतेच लहान मुलांचे कक्ष ही सेवा सुरू केले आहे.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ मशीन २, म्हसळा, माणगाव ४, मुरुड तालुक्यात डायलिसिस सेंटर मंजुर झाले आहे. असे सांगितले.

.रोहा तालुका आणि परिसरातील किंडनी विकार रुग्णास डियालेसिस उपचारा करिता सद्या इतरत्र जावे लागत आहे.उपजिल्हा रुग्णालय,रोहा येथे किडनी विकार रुग्णास डियालेसिस उपचार उपलब्ध झाले आहेत.

सद्या डियालेसिस विभागामधे २ मशीन कार्यवित आसुन. एका दिवासत ३ त्ये ४ रुग्णाचे डियालेसिस केले जाऊ शकते. ३ दिवसांच्या स्लॉट मधे ९ त्ये १० रुग्णास डायलीसिस केले जाणार आहे. विभागामधे तातडीच्या उपचाराचे नियोजन केलेले आहे.उपजिल्हा रुग्णालयातील बाह्यरुग्ण व अंतररुग्णसेवे प्रमाणे डायलिसिस विभागात ही सेवा निःशुल्क पुरवली जाणार आहे.

आगाऊ नोंदणी केलेल्या रुग्णाना प्राधान्याने डियालेसिस करिता घेतले जाणार असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ.सचिन गोमसाळे व डॉ. विश्वनाथ देशमुख यांनी दिली आहे.

## ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशनतर्फे पर्यावरण संरक्षणासाठी बांबू लागवड

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशन व सँडोज फार्मास्युटिकल कंपनीच्या संयुक्त विद्यमाने बेलापूर सेक्टर -९ येथील ग्रीन व्हॅली येथे रविवारी १०० बाबूंची लागवड करण्यात आली. सीएसआर फंडाच्या विनियोगातून पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देणे आणि कार्बन फूटप्रिंट कमी करणे हा बांबू लागवडीमागील उद्देश असल्याचे संदीप शिंदे यांनी सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे डी. बी. पाटील, सॅन्डोज कंपनीचे प्रतिनिधी प्रसन्न शेलार, संदीप शिंदे, सजग नागरिक मंचाचे संघटक सुधीर दाणी व ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशनचे सदस्य भक्ती कंबलचा व अन्य सदस्य उपस्थित होते. बांबू हि अतिशय वेगाने वाढणारी पर्यावरणपूरक वनस्पती आहे. बांबू कार्बन डायऑक्साइड मोठ्या प्रमाणात शोषून घेतो आणि भरपूर प्रमाणात ऑक्सिजन तयार करतो. त्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने बांबू लागवड उपयुक्त ठरत असल्याने बांबू लागवडीस प्राध्यान्य दिले गेले होते. बांबू लागवडीतून सँडोजने पर्यावरण प्रती आपली कटीबद्धता स्पष्ट केल्याचे सुधीर दाणी यावेळी म्हणाले.

त्याचबरोबर बांबूच्या मुळांची पकड खोलवर असल्यामुळे तो मातीची धूप रोखतो. डोंगर उतारांवर, नदीनाल्यांच्या काठावर बांबूची लागवड केल्यास मृदा संरक्षणात मदत होते. बांबू लागवड ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्याही लाभदायक असून शाश्वत विकासासाठी एक महत्त्वाचा पर्याय आहे असे प्रदूषण मंडळाचे अधिकारी डी. बी. पाटील यांनी सांगितले. आगामी काळात याच ठिकाणी वड, पिंपळ, कडुनिंब अशा देशी वृक्षांची देखील लागवड ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशनद्वारा केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

पान १ वरून

## आदिवासींच्या बाधित घरांचा सर्वे करून अहवाल सादर करा -मंत्री डॉ. अशोक उईके

या पार्श्वभूमीवर आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, वडघर विभागीय अध्यक्ष समीर केणी, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, कर्णा शेलार, आदिवासी संघटनेचे श्री. लांडगे, गणेश कातकरी, गुरू पवार, संतोष पवार, सिडकोचे ढगे आदी उपस्थित होते. या वेळी मंत्री उईके यांनी सिडकोचा एक अधिकारी नेमून आदिवासींच्या बाधित घरांची स्थळपाहणी करा आणि त्याचा अहवाल सादर करा, असे निर्देश दिले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी पनवेल-उरण विधानसभा क्षेत्रामधील सिडको हद्दीत जेवढ्या आदिवासीवाड्या आहेत त्यात सुमारे सातशे ते आठशे जास्तीत जास्त एक हजार कुटुंब असतील. त्यांना प्रत्येकी एक हजार स्केअर फूटचा एक गुंठा प्लॉट उपलब्ध करून दिल्यास त्यांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन होईल, अशी मागणी मंत्री डॉ. उईके यांच्याकडे केली. मंत्रीमहोदयांनी आदिवासींसाठी अशाच प्रकारे चांगली वसाहत निर्माण करू, असे आश्वासित केले.

## मेघराज पाटील यांना सेवानिरोप

**उरण : बातमीदार**

सौरभ मंगल कार्यालय दोंडाईचा जिल्हा धुळे येथे २२० के. व्हि. उपकेंद्र दोंडाईचा येथील मुख्य तंत्रज्ञ वर्ग दोन मेघराज प्रेमसिंग पाटील यांचा सेवापूर्ती, सन्मान सोहळा प्रचंड उत्साहात झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष पियुष शर्मा (मुख्य अभियंता राज्य पारेषण उपक्रम मुख्य कार्यालय प्रकाशगंगा, मुंबई) उपस्थित राहिले. उत्सवमुर्ती मेघराज पाटील यांनी केलेल्या कामाबद्दल आदराने गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व उपस्थित मान्यवर मंडळींचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व पर्यावरण संवर्धनाकरिता रोपटे देऊन सत्कार करण्यात आले. त्यानंतर उत्सवमुर्ती मेघराज पाटील व यांच्या सुविद्य पत्नी ललिता यांचासह शाल साडी, पुष्पगुच्छ, भेटवस्तू प्रशंसापत्र सन्मानपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन योगेश भामरे व सेजल काकडे यांनी तर किशोर भामरे यांनी आभार मानले.

## कै. मोरेश्वर भगत शिक्षण संस्थेच्या सभागृहाला खासदार सुनील तटकरेंचे नाव

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कै. मोरेश्वर भगत शैक्षणिक सामाजिक विकास संस्था खारपाडा येथील सभागृहाला खासदार सुनील तटकरे सभागृह असे नाव देण्यात आले असून सभागृह नामकरण सोहळा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते, माजी आमदार अनिकेत तटकरे ह्यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा कै मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष दयानंद भगत यांनी आयोजित बैठकीत दिली.

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाची जय्यत तयारी खारपाडा विभागाच्या वतीने करण्यात आली असून यानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस खारपाडा, ठाकूरपाडा, दुष्मी, खैरासावाडी, वडमाळवाडी येथील पदाधिकारी याची बैठक कै मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्था मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय येथे झाली.

या बैठकीस वाचनालय उपाध्यक्ष रमेश घरत, माजी उपसरपंच हासुराम ठाकूर, माजी दिव्यांग प्रहार संघटना अध्यक्ष भालचंद्र भगत, माजी उपसरपंच महादेव भगत, ग्रा. सदस्य अनिता भगत, पेण विधानसभा महिला चिटणीस ललिता ठाकूर, विलास भगत, खारपाडा शाखा अध्यक्ष माजी सरपंच अरुण घरत, पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, आदींसह विविध भागातील पदाधिकारी उपस्थित होते.


## दुखवटा

### अनंत ठाकूर



**उरण :** खोपटे द.पी.पाडा येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनंत धनाजी ठाकूर(६७)यांचे अल्पशा आजाराने नवी मुंबई येथील अपोलो रुग्णालयात निधन झाले . त्यांच्या मागे त्यांची पत्नी,मुलगा,सून, मुली,जावई,भाऊ आणि नातवंडे असा परिवार आहे . त्यांचे अंत्ययात्रेसाठी नातेवाईक,मित्रमंडळीसह,तालुक्यातील स्वयंसेवी संस्थांनचे पदाधिकारी व हितचिंतकांनी मोठी गर्दी केली होती.

### हर्षद शहा



**धाटाव :** रोहा शहरातील ज्येष्ठ व्यावसायिक आणि प्रसिद्ध दानशूर व्यक्तिमत्व हर्षद मंगलदास शहा तथा मेहताजींचे शुक्रवारी रात्री वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. सोमवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, मुलगा मिलन शहा, विपुल शहा, मुलगी मनिषा, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मंगळवार दि. ८ जुलै रोजी दुपारी ४ वाजता रोहा बाजारपेठेतील पोरवाल भवन येथे स्व. हर्षदभाई शहा तथा मेहताजी यांच्या शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# खारघरमध्ये घरफोडीच्या घटना

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून रहिवाशांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरात शुक्रवारी रात्री १० ठिकाणी घरफोडी झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये लाखोंचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली गेली. खारघरच्या वास्तू विहार येथील संस्कृती को-ऑप हाऊसिंग सोसायटीच्या बंद असणाऱ्या पाच फ्लॅटमध्ये तसेच पारिजात को-ऑप हाऊसिंग सोसायटीमध्ये मध्यरात्री तीनच्या सुमारास घरफोडी झाली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी वास्तु विहारमधील रहिवाशांशी संवाद साधत त्यांची व्यथा जाणून घेतली.



या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, मी पोलिसांशी या घटनेसंदर्भात बोललो आहे. पोलीस प्रशासनाने या संदर्भात पाठपुरावा केला पाहिजे, पण पोलिसांकडून लवकरात लवकर कारवाई करू म्हणून सांगितले जातेय. त्याचबरोबर नागरिकांना तपास चालू आहे याच्या पलीकडे काही सांगितले जात नाही. उलट मनुष्यबळ अपुरे हे कारण दिले जात आहे. हे सगळे जे दिसतेय ते पाहता पोलीस प्रशासन या अशा पद्धतीच्या संवेदनशील घटनांच्या बाबतीमध्ये संवेदनशील नाही असे जाणवत आहे. नागरिकांना सुरक्षिततेची जाणीव करून देणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. यामध्ये खारघर पोलीस कमी पडतात असे दिसतेय आणि ही चिंताजनक बाब असल्याचे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले.

# कळंबोली मैदान नूतनीकरणानंतर निशुल्क खुले करण्याची मागणी

## आमदार प्रशांत ठाकूर व मनपा आयुक्तांना निवेदन

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमधील सर्वसामान्यांसाठी खुले असलेले छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाचे नूतनीकरण महापालिकेने हाती घेतले आहे. त्याबाबत निविदाही काढण्यात आली आहे, मात्र या मैदानाचे नूतनीकरण करताना आवश्यक क्रीडाविषयक बाबींचा समावेश करून मैदान कळंबोली वासियांसाठी निःशुल्क अन मोफत वापरासाठी खुले असावे, अशी लेखी मागणी माजी नगरसेवक विजय खानावकर यांनी आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये सिडको निर्मित सेक्टर १ मध्ये भले मोठे खुले मैदान आहे. या मैदानाचा सद्यस्थितीत



वापर कळंबोलीतील क्रीडापटू नेहमी करत असतात. आता महापालिकेने या मैदानाचे नूतनीकरण करण्यासाठी मोठी निविदा काढलेली आहे, मात्र मैदानाचे नूतनीकरण केल्यानंतर मैदान हे सर्वसामान्यांसाठी मोफत खुले असणार नसल्याच्या बातमीने कळंबोलीकर आणि क्रीडापट्टूंचा हिरमोड झाला आहे.

याबाबत क्रीडाप्रेमींनी संताप व्यक्त करून महापालिकेने हे मैदान कायमस्वरूपी सर्वसामान्यांसाठी मोफतरित्या खुल्या असावे याकरता खानावकर यांनी पनवेलचे दमदार आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना पत्रानुसार मैदान हे सर्वसामान्यांसाठी, माथाडी कामगारांच्या मुलांसाठी, शेतकऱ्यांसाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी कायमचे मोफत आणि नेहमी खुले असण्याची मागणी केली आहे. तसेच क्रीडा विषयक कोणकोणत्या बाबींचा समावेश या नूतनीकरण करण्यामध्ये करण्यात यावा याचीही मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

यामध्ये मैदान हे ७० मीटर परिघाचे क्रीडापटूंसाठी करण्यात यावे, कायमस्वरूपी हायमास्ट व विद्युत झोताची व्यवस्था ही करण्यात यावी. ज्येष्ठ नागरिकांसाठी या क्रीडा संकुलात स्वतंत्र व्यायामाची, मेडिटेशनची व्यवस्था करण्यात यावी. क्रीडा संकुलात खेळाचा कणा समजल्या जाणाऱ्या जिम्नॅस्टिक क्रीडा बाबींचा समावेश व त्यासाठी स्वतंत्र दालन खुले असावे, क्रीडांगणात व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबल, टेनिस व अन्य खेळांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. प्रेक्षक गॅलरी ची व्यवस्था व त्याची निर्मिती करावी, क्रीडांगणाच्या सभोवताल हा हिरवेगार झाडे लावून बहरून टाकावा, पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था असावी.

# पनवेल मनपात लोकशाही दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि.७) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत नागरी सेवा सुविधा, विविध सेवा सुविधा देण्याबाबत वेगवेगळ्या विभागाचे आठ अर्ज दाखल झाले होते, यावेळी नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याविषयी संबंधित विभागास आदेश देण्यात आले. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री, डॉ.वैभव विधाते, स्वरूप खारगे, अभिषेक पराडकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार, उप अभियंता विलास चव्हाण, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, विभाग प्रमुख, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.



# आषाढी दिंडीत फराळाचे वाटप



**उरण : वार्ताहर**

आषाढी एकादशी निमित्त रविवारी (दि. ६) उरण मोरा कोळीवाडा येथील आदिनाथ नामधारक मंडळ यांच्या वतीने सालाबादप्रमाणे पालखी -दिंडी काढण्यात आली होती.

मोरा येथून पालखीला प्रारंभ झाला. पुढे भोवरा, बोरी येथून पुढे स्वामी विवेकानंद चौक येथे उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांसृतिक संस्था उरण वतीने फराळाचे वाटप करण्यात आले. उरणचे आमदार महेश बालदी यांनी या उपक्रमास भेट देवून सर्वांचे कौतुक केले. दिंडीतील भक्तांना वेफर्स, केळी, राजगिरा लाडू व पाण्याची बाटली देण्यांत आली.

या वेळी उरण महिला सामाजिक शैक्षणिक व सांसृतिक संस्था उरण चे अध्यक्ष गौरी देशपांडे, सचिव निशा शिरधनकर, खजिनदार वर्षा पाठारे व आजच्या कार्यक्रमाच्या कार्यध्यक्ष दिपाली शिंदे, कल्याणी दुखंडे व सर्व कार्यकारिणी सदस्या संगीता पवार, तृप्ती भोईर, गौरी मंत्री, दिपा मुकादम, प्रगती दळी, गीता पवार, ज्योत्सना येरुणकर, दया परदेशी, शुभांगी शिंदे आदी उपस्थित होते.

# कोशिश फाऊंडेशनतर्फे शालेय वक्तृत्व स्पर्धा

## *प्राथमिक फेरी सीकेटीत संपन्न*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यामाने, आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली होती. पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व शाळांमध्ये शालेय वक्तृत्व स्पर्धा बुधवारी (दि.२) सीकेटी स्कूल, नवीन पनवेल येथे संपन्न झाला.

आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत शालेय वक्तृत्व स्पर्धा या वर्गनिहाय आज सकाळच्या सत्रात घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी या दोन गटात एकूण १२६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धकांमधून प्रत्येक वर्गातून पाच असे एकूण उत्कृष्ट भाषण स्पर्धक निवडण्यात आले.



कार्यक्रमासाठी माननीय सुशीला घरत माजी नगरसेविका, पनवेल महानगरपालिका तसेच मयुरेश नेतकर आणि त्यांचे सहकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यक्रमासाठी सीकेटी इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा मॅडम तसेच इतर विभागातील प्राचार्य, सर्वविभाग प्रमुख, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांचेही उत्तम सहकार्य लाभले.

## निवडक

### लाखोंचा गुटखा हस्तगत

**पनवेल :** तळोजा पोलिसांनी दोन लाखांचा गुदखा जप्त केला. या प्रकरणी रामसिंग रेहवतसिंग टेवडा (रा. सेक्टर २ तळोजा) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तळोजा सेक्टर २ येथील सोसायटीच्या शॉप मध्ये गुटख्याची साठवणूक केल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी शॉप मध्ये गुटख्याच्या पिशव्या सापडून आल्या. दोन लाख १ हजार ५३० रुपयाचा गुटखा पोलिसांनी जप्त केला

### अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**पनवेल :** तळोजा फेज-१ येथे राहणारी १५ वर्षीय मुलगी गेल्या जानेवारी महिन्यात बेपत्ता झाली असून अद्याप तिचा शोध लागला नाही. तळोजा पोलिसांनी बेपत्ता मुलीचा सीसीटीव्हीच्या मदतीने शोध घेतला, मात्र अद्याप ती सापडलेली नाही. ही मुलगी तळोजा फेज १, सेक्टर - १० मध्ये तिच्या कुटुंबासह राहत होती. २४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४.५० वाजता ती घरात कोणाला काही एक न सांगता रागावून घरातून निघून गेली. अद्याप ती कुठेच सापडली नाही. तिची उंची ५ फूट, रंग गोरा, सडपातळ बांधा असे तिचे वर्णन असून तिने अंगात पांढरा कुर्ता, पांढरा पायजमा परिधान केली आहे. अशा वर्णनाची मुलगी कोणाला दिसल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे

### तरुणी बेपत्ता; अपहरणाचा गुन्हा

**पनवेल :** पांजरपोळ, पनवेल कोळीवाडा येथे राहणारी सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या तरुणीची उंची पाच फूट, तीन इंच असून रंग गोरा आहे. तिच्या डाव्या गालावर तीळ असून अंगात काळी कुर्ती, काळा पायजामा घातला आहे. तिला मराठी, हिंदी भाषा बोलता येते. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वारकऱ्यांना फराळ वाटप

**उरण :** आषाढी एकादशी निमित्त रविवारी मोरा कोळीवाडा येथील आदिनाथ नामधारक मंडळ वतीने मोरा येथुन



निघालेल्या माऊलींच्या पालखीत सहभागी असलेल्या वारकरी मंडळींना सारा प्रोडक्शन चे अध्यक्ष तथा समाजसेवक राजेश पाटील यांच्या वतीने नागाव येथील समर्थ बंगला येथे माऊलींच्या पालखीत सहभागी असलेल्या वारकरीमंडळींना चहा, लाडु, केळी व फराळाचे वाटप करण्यात आले. यंदाचे ९ वे वर्ष आहे. कार्यक्रमाचे आयोजक समर्थ राजेश पाटील असून भावना कैलास म्हात्रे व कांचन राजेश पाटील, चार्वी राजेश पाटील, मनिषा निवेडकर, दत्तात्रेय घरत, काशीनाथ ठाकुर आदींचे सहकार्य मिळाले.

### पनवेलमध्ये १२५ विद्यार्थ्यांचा सन्मान

**पनवेल :** अंजनी सराफ आयोजित गुरुकुल एज्युकेशन आणि कल्चरल ट्रस्टद्वारे पनवेल मध्ये आयोजित विजयी सेलिब्रेशन २०२५ कार्यक्रमात १२५ विद्यार्थ्यांना पुरस्कृत आणि सन्मानित करण्यात आले. यावेळी सन्मानित करण्यात आलेले सर्व विद्यार्थी नृत्य प्रतियोगिता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर परफॉर्मन्स केलेले आहेत. या विशेष कार्यक्रमादरम्यान विजेत्या कलाकारांना ट्रॉफी आणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पाच वर्षांचा कुशल रहा हा या प्रतियोगिता मध्ये विजेता झाला. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, डान्स कोच मास्टर युसूफ हुसेन, रीना दलाल, नाजनीन पालेकर, पूजा बनसोडे, पद्मा सराफ, अनंत सराफ यांच्यासह शिक्षा आणि कलाक्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.



# उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये दिंडी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे विविध कार्यक्रमासहित दिंडी सोहळा उत्साहात झाला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने स्कूलमध्ये विशेष परिपाठसहित वेग वेगळे कार्यक्रम घेण्यात आले.

या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी चल ग सखे पंढरीला हे भक्तीगीत सादर केले. त्यानंतर सगळ्यांच लक्ष वेधून घेतलं ते इ ४थी च्या विद्यार्थ्यांनी भक्त पुंडलिक याच्या जीवनावर आधारित आई वडिलांची सेवा हे आपले परम कर्तव्य आहे यावर सुंदर असा नाट्यदेखावा सादर केला. हे पाहताना सगळे भारावून गेले. तसेच चौथी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर नृत्य सादर केले.

आषाढीचे महत्व या विषयावर भाषण झाले भक्तिमय व मंगलमय अशा वातावरणात दिंडी काढण्यात आली. छोटे वारकरी, शिक्षक वृंद व शालेय कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांसोबत फुगड्या व नृत्य करत सहभागी झाले होते. टाळ मृदुगाच्या गजरात पालखी सोहळा झाला.



# उरण टपाल कार्यालयासाठी जागेची मागणी

## इच्छुकांनी २८ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या टपाल विभागातर्फे उरण येथे नवीन टपाल कार्यालय स्थापन करण्यासाठी उरण परिसरात भाडे तत्वावर जागेची मागणी करण्यात आली आहे. यासाठी सुमारे १ हजार २६४ चौरस फूट चटई क्षेत्रफळ/ बांधकाम क्षेत्रफळ असलेली जागा आवश्यक असून, इच्छुकांनी २८ जुलैपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांनी केले आहे.

भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने उरण परिसरात टपाल कार्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जागा भाडेतत्वावर देण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था किंवा बांधकाम व्यवसायिक यांनी अपेक्षित भाडे, उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ, अटी व शर्ती (काही असल्यास) व जागेच्या तपशीलासह आपले अर्ज प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी - ४००७०३ या कार्यालयाकडे दि. २८ जुलै २०२५ रोजी, दुपारी ४.३० वाजेपर्यंत सिलबंद लखोटयात पाठवावेत.

जागा निवडताना तिची उपयुक्तता व दैनंदिन पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. जागेचे चटई क्षेत्र/ बांधकाम क्षेत्र हे १ हजार २६४ चौरस फूट(अंदाजे) उरण टपाल कार्यालयासाठी असावे. थोडासा क्षेत्रफळात फरक असला तरी तो ग्राह्य धरला जाईल.

अर्जासोबत इमारतीचा बांधकाम आराखडा, जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी, पंचायत परवानगी, ७/१२ उताऱ्याची प्रत, वीज व पाण्याचे स्वतंत्र मीटर या संदर्भातील अर्जदाराच्या नावे असलेली आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २८ जुलै २०२५ असून, दुपारी ४.३० वाजेपर्यंत अर्ज सादर करता येतील.

अधिक माहितीसाठी प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी - ४००७०३ (०२२-२७६६६६६५/२७६६३११३) यांच्याशी सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर बी.व्ही. एन. सुरेश यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.





**पनवेल :** भाजपचे नेते किरण दाभणे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेविका अरुणा दाभणे, पनवेल तालुका उत्तर मंडळचे अध्यक्ष दिनेश खानावकर, अंकुश पाटील, यतीन पाटील, सोहम दाभणे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# हृदयविकार लशीमुळे नाही

अलीकडच्या काळात तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते आहे. नियमित व्यायाम करून स्वत:ला वरकरणी फिट ठेवणाऱ्या तरुणांचाही अशातऱ्हेच्या अकस्मात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. यात काही नामवंतांचाही समावेश असल्याने याकडे अधिक लक्ष वेधले जाते आहे. तरुणांमध्ये वाढलेल्या हृदयविकाराच्या झटक्यांच्या प्रमाणाला कोरोनाची लस कारणीभूत असल्याचे दावे केले जात होते. परंतु आयसीएमआर आणि एम्स यांनी हृदयविकाराच्या वाढत्या प्रमाणाचा कोव्हिड लशीशी संबंध नसल्याचे नुकतेच स्पष्ट केले आहे.

**अवघे ४२ वर्षे वय असलेल्या शेफाली जरीवाला या तरुण अभिनेत्रीचा अलीकडेच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. तिच्यासारखाच 'बिग बॉस' या मालिकेमुळेच घराघरात ओळखीचा चेहरा बनलेला अभिनेता सिद्धार्थ शुक्लाही वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने मरण पावला होता. आणि या अशा एकट्या-दुकट्या केसेस नाहीत. अलीकडच्या काळात देशभरातील अनेक तरुण नामवंतांचा अशा तऱ्हेने हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. गायक केके, कन्नड सुपरस्टार पुनित राजकुमार अशी कितीतरी नावे यासंदर्भात घेता येतील. तिशी-चाळीशीतील व्यक्तींचे अशा तऱ्हेने हृदयविकाराने मृत्यू होत असल्यामुळे त्याबद्दल तज्ज्ञांकडूनही चिंता व्यक्त होते आहे. सगळ्यांनीच नियमितपणे आरोग्य तपासणी करून घेतल्यास हे टाळता येईल असे मत तज्ज्ञ व्यक्त करीत असतानाच तरुणांमध्ये अचानक वाढलेल्या हृदयविकाराच्या झटक्यांच्या प्रमाणाला कोरोनाची लस कारणीभूत ठरत असल्याचे दावे केले जात होते. परंतु भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) आणि अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) यांनी हृदयविकाराच्या वाढत्या प्रमाणाचा कोव्हिडच्या लशीशी कुठलाही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानेही तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे वाढलेले प्रमाण आणि कोरोनावरील लस यांचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. आयसीएमआरने केलेल्या संशोधनातून या दोन्ही गोष्टींचा परस्परांशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले आहे असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. चुकीची जीवनशैली, अनुवंशिकता किंवा आधीपासून असलेले संबंधित आजार यामुळे बहुतांश तरुणांमध्ये हे अपमृत्यू दिसून येत असल्याचे समजते. यासंदर्भात अधिक संशोधन सुरू असल्याचेही या संस्थांनी नमूद केले आहे. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर अंतिम निष्कर्ष जाहीर होतील. कोरोनाची लस बनवणाऱ्या स्ट्राझेनेका या कंपनीने आपल्या लसीचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात असे वर्षभरापूर्वी म्हटले होते. या लशीमुळे काही लोकांना थ्रोम्बोसिस विथ थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम सारखी स्थिती उद्भवू शकते असे या कंपनीने म्हटले होते. या स्थितीत शरीरात रक्ताच्या गाठी तयार होतात आणि प्लेटलेटची संख्या कमी होते. त्यामुळे मेंदूचा स्ट्रोक किंवा हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता वाढते. परंतु एकच लस वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे परिणाम आणि दुष्परिणाम दाखवू शकते. त्यामुळे युरोपात जे साइड इफेक्ट दिसले तसेच ते भारतात किंवा अन्य आशियाई देशांत दिसतील असे होऊ शकत नाही. कारण प्रत्येक व्यक्तीची जनुकीय रचना वेगळी असते असे यासंदर्भात काही तज्ज्ञांनी म्हटले आहे. बहुतेक रुग्णांसाठी कोविड लस घेतल्याचे फायदे कोणत्याही जोखमीपेक्षा अधिक आहेत याकडेही युरोपातील तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. त्यामुळे आधी एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात पूर्वीपेक्षा हृदयविकारांचे प्रमाण वाढले आहे का हे तपासून त्यामागच्या कारणांचा नीट सखोल अभ्यास व्हायला हवा आहे.**

# खोपोली परिसरात पावसाळी पर्यटकांची गर्दी





**खबरबात**
**जयवंत माडपे**

यावर्षी पावसाळा मे महिन्यापासूनच सुरू झाला असल्याने, खोपोली परिसरातील मान्सून पर्यटन मौसम वेळेपूर्वी बहरला आहे. जून महिन्यात मागील आठ दहा दिवसांपासून खोपोली परिसरात दमदार पाऊस पडत आहे. असाच पाऊस राहिल्यास आगामी आठवड्यात पावसाळी पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेला व तरुणाईत विशेष आकर्षण असलेला झेनिथचा दुधाळ पाण्याचा धबधब्या सहित , खंडाळा घाट , आडोशी आणि डोनवत डॅम परिसरात पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटकांचे पाऊले खोपोलीच्या दिशेने वळतील.

हिरवा शालू ओडलेल्या सह्याद्री पर्वताच्या भव्य रांगा वरील धोधो कोसळणारे स्वच्छ पाणी अंगावर घेत निखळ पावसाळी पर्यटनाचा आनंद घेवायाचा असल्यास या पावसाळ्यात पर्यटकांनी एखदा तरी खोपोली परिसरात यावे असे येथील वातावरण व निसर्ग आहे . मुंबई - पुण्यापासून ८० किमी अंतरावर व रेल्वे आणि महामार्ग अशा दोन्ही वाहतुकीच्या सुविधेने जोडलेल्या खोपोली शहराच्या जवळ असलेले खंडाळा घाट , झेनिथ धबधबा व डोनवत ; आडोशी डॅम हे ठिकाणे दरवर्षी पावसाळी पर्यटकांची गर्दी खेचण्यास यशस्वी ठरत आहेत. मात्र आपले पर्यटन आनंदी , आणि सुस्थित होण्यासाठी आवश्यक काळजी व महत्वाची सुरक्षा येथे येणाऱ्या पर्यटकांनी पाळल्याची गरज आहे . खोपोली परिसरातील मनसोक्त पावसाळी पर्यटनाचा आनंद इतर ठिकाणी मिळणार नाही असे येथील वातावरण बनले आहे . म्हणूनच दरवर्षी पावसाळी हंगामात लाखो पर्यटक येथे येवून पावसाळी पर्यटनाचा मनसोक्त घेण्यासाठी उत्सुक असतात .

**कोणती काळजी घ्यावी :** पावसाच्या जोराबरोबर झेनिथ धबधब्याला अचानक पाणी वाढत असल्याने पाण्याच्या प्रवाहात आपण अडकणार नाहीत, म्हणून येथे असलेले सुरक्षा नियमावली , नेमलेल्या सुरक्षा रक्षक व अग्निशामक दलाकडून मिळालेल्या सुचानाचे तंतोतंत पालन करावे.मद्यपान किंवा नशा निर्माण होईल असे पदार्थ सेवन करून येथे जाऊ नका .उत्साहाच्या भरात येथील अडचणीच्या डोंगराच्या कपार्यात जाऊ नका ,खोल पाण्याच्या प्रवाहात जाणे व दगड कोसळण्याची शक्यता बघता धबधबा कोसळतो किंवा डॅम मधील पाण्याचा प्रवाह येतो तेथे न जाता त्या पासून काही अंतरावर मनसोक्त चिंब भिजण्याचा आनंद घ्या .

**जेवण अथवा खाण्याची सोय**

या दोन्ही ठिकाणापासून काही अंतरावरच उत्तम धाबे व हॉटेल्स असून, यात शाखाहारी व मांसाहारी उत्तम खाद्य पदार्थ माफक दरात मिळतात .त्यामुळे तुम्हच्या पोटाची उत्तम काळजी येथे खिशाला कातर न लागता घेतली जाते .

**कसे जाल :** मुंबई पासून मुंबई -पुणे दोन्ही महामार्ग किंवा खोपोली पर्यंत लोकल सेवा उपलब्ध असल्याने दिवस भरात कोणत्याही वेळेत येथे कोणतीही दगदग न होता येता येते . झेनिथ धबधबा खोपोली बस स्थानक किंवा रेल्वे स्टेशन पासून पायी चालत गेले तर पंधरा ते वीस मिनिटाच्या अंतरावर असून आडोशी, डोनवत डॅम हि खोपोली पासून दहा किमी अंतरावर आहे. खोपोली - पेण रस्त्यावर रस्त्यापासून हाकेच्या अंतरावर हे ठिकाण आहे. खंडाळा घाट तर सर्वांना परिचित आहेच. पुण्याकडून येतानाही रेल्वे व बस अथवा खासगी वाहनाची मुबलक सुविधा असल्याने येथे येण्यासाठी फारशी चौकशी करण्याची गरज नाही.

**येथे येण्यासाठी उत्तम कालावधी**

जून महिन्याच्या मध्यापासून ते सप्टेंबर या महिन्यात पावसाचा अंदाज घेऊन आपण येथे येवू शकता. एक दिवसांत हे सर्व ठिकाणे होत असल्याने मुकामाची आवश्यकता शक्यतो नाही.


**सुरक्षेकरिता स्थानिक यंत्रणा**

खोपोली नगरपालिका व खोपोली पोलिसांकडून सुरक्षाच्या सूचना देण्यात येतात त्याचे तंतोतंत पालन करावे . कोणतीही गंभीर आपत्कालिन स्थिती निर्माण झाल्यास येथील अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय ग्रूपचे सदस्य मदतीसाठी उपलब्ध आहेत .

**आपत्कालीन मदतीसाठी**

खोपोली नगरपालिका अग्निशमन दल, खोपोली पोलीस स्टेशन सहित हेल्प ग्रुपचे समन्वयक गुरुनाथ साठेलकर ७७७४८१२२२२ व या मोबाईलवर संपर्क करावा.

# मराठी साहित्यातील 'कलंदर फकीर' : गोपाल नीलकंठ दांडेकर



गोपाल नीलकंठ दांडेकर सहयाद्रीच्या कडेकपाऱ्या, गड-किल्ले यांच्या कुशीत रमलेले, पूर्णेपासून नर्मदेपर्यंत अवघ्या मुलखाचे पाणी चाखलेले, शिवबाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हरेक गडावरची धूळ मस्तकी धारण करणारेव्यक्तिमत्त्व. शिवरायांचे पदचिन्ह, हाताचा ठसा व अस्थिशेष आपल्यापाशी आहे, याची श्रीमंती बाळगणारा हा अस्सल मराठी मातीतला माणूस.या साऱ्या भटकण्याचेच अनुभव झाले. या अनुभवांतूनच साहित्य प्रसवले. त्यातून मराठी मातीशी नाते सांगणाऱ्या, छत्रपतींच्या काळात नेणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. अखंड भ्रमंतीतून आलेले आगळेवेगळे अनुभवच शब्दरूप घेऊन आले. गोनीदां ऊर्फ अप्पांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील परतवाडा येथे झाला. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांनी घर सोडले. तेव्हापासून त्यांच्या पायाला भिंगरी लागली ती कायमचीच. संत गाडगेबाबांजवळ ते राहिले, त्यांच्याबरोबर हिंडले. 'सोपे लिहिणे व बोलणे ही गाडगेबाबांची देणगी;' असे गोनीदां म्हणत नर्मदेची पायी परिक्रमा हा गोनीदांच्या जीवनातला एक रोमहर्षक भाग होता. या परिक्रमेत त्यांनी जीवन पाहिले. या अनुभवाचा त्यांना पुढे लेखनात फार उपयोग झाला.त्यांच्या आत्मचरित्रात्मक 'स्मरणगाथा'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार ही त्यांना मिळाला.

साभार - इंटरनेट



## बदलते तंत्रज्ञान

# टेक कंपनी एएमओचे दोन वन प्लस स्मार्टफोन

लाँच टेक कंपनी एएमओ ८ जुलै रोजी दोन वन प्लस स्मार्टफोन वन प्लस नोर्ड ५ आणि नोर्ड सीइ ५ लाँच करणार आहे. कंपनीने जारी केलेल्या टीझरनुसार, नोर्ड सीइ ५मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ८३५० प्रोसेसर आणि ७१०० mah बॅटरी असेल. त्याच वेळी नोर्ड ५मध्ये क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८एस जनरल ३ प्रोसेसर, ७३००m-h बॅटरी आणि ५०एमपी कॅमेरा असेल.



वन प्लस नोर्ड ५ : अपेक्षित स्पेसिफिकेशन्स

डिस्प्ले: कंपनी वन प्लस नोर्ड ५मध्ये 144Hz रिफ्रेश रेटसह ६.८३-इंचाचा -अमोलड् डिस्प्ले देऊ शकते. स्क्रीन रिझोल्यूशन १,२७२ x २,८०० पिक्सेल असू शकते आणि पीक ब्राइटनेस ३००० nits असू शकते.

कॅमेरा : फोटोग्राफीसाठी, नोर्ड सीइ 4 लाइट च्या मागील पॅनलमध्ये ५०एमपी चा प्रायमरी कॅमेरा आणि ८एमपी चा अल्ट्रा-वाइड लेन्स मिळू शकतो. तर, सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी ५०एमपी चा फ्रंट कॅमेरा अपेक्षित आहे.

सॉफ्टवेअर: फोनमध्ये क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८एस जेन ३ चिपसेट असेल. हा फोन अँड्रॉइड १५ वर आधारित नवीनतम ऑक्सिजन ऑपरेटिंग सिस्टमसह येऊ शकतो.

रॅम : कंपनी वन प्लस नोर्ड ५मध्ये दोन रॅम-स्टोरेज पर्याय देऊ शकते. यात ८ जीबी आणि १२ जीबी रॅम सोबत २५६ जीबी आणि ५१२ जीबी स्टोरेज पर्याय असू शकतात.

बॅटरी आणि चार्जिंग : रिपोर्ट्सनुसार, येणाऱ्या डिव्हाइसमध्ये 80 वॅट किंवा 100वॅट सुपर कनेक्टिव्हिटी: कनेक्टिव्हिटीसाठी, फोनमध्ये ५जी, ४जी, ३जी, २जी, वाय-फाय, ब्लूटूथ ५.२,जीपीएस, एफएम रेडिओ आणि चार्जिंगसाठी युएसबी टाइप-सी पोर्टचा पर्याय असू शकतो तसेच स्टोरेज वाढवण्यासाठी मायक्रो एसडी कार्डचा पर्यायदेखील असू शकतो.

हलक्या पावसात भिजले तरी ते खराब होणार नाही.वन प्लस नोर्ड ५ स्मार्टफोनला आय पी ६५ रेटिंग देण्यात आले आहे. या रेटिंगचा अर्थ असा आहे की तुमचा फोन वॉटर स्प्लॅश आणि हलका पाऊस सहन करू शकतो. ८ जीबी+१२८ जीबी व्हेरिएंटची किंमत ३५,९९९ रुपये आणि १२ जीबी+२५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ३९,९९९ रुपये असू शकते.

# मराठ्यांचा इतिहास लिहिणारा ग्रँट डफ



**निमित्त**

मराठ्यांच्या इतिहासावर लिहिणारा सुप्रसिद्ध इतिहासकार कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ. त्याचा जन्म ८ जुलै १७८९ रोजी बॅम्फ (स्कॉटलंड) येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर त्याने अबर्डीन येथील मार्शल महाविद्यालयात प्रवेश घेतला, पण शिक्षण अपुरे टाकून तो सोळाव्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीत मुंबईच्या लष्करात नोकरीला आला.

१८०६ साली बॉम्बे नेटिव्ह इन्फट्री अथवा बॉम्बे ग्रेनेडिअर्समध्ये त्याला अधिकाराची जागा मिळाली. एल्फिन्स्टनने त्यास मुद्दाम पुण्यास बोलावून घेतले. १८१७च्या खडकी येथील मराठ्यांबरोबरच्या युद्धात त्याने प्रसंगावधान दाखवून शौर्य दाखविले. या सुमारास त्याचा एल्फिन्स्टनशी चांगला परिचय झाला आणि त्यास कॅप्टन हा किताब मिळाला. १८१८मध्ये त्याची एल्फिन्स्टनने साताऱ्यास पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती केली. तो साताऱ्यास १८१८ ते १८२२ अशी चार वर्षे राहिला आणि साताऱ्याची राजकीय व्यवस्था लावून प्रतापसिंहास सुशिक्षित केले.

१८२३च्या जानेवारीत तो मायदेशी रजा घेऊन गेला, तो पुन्हा हिंदुस्तानात परत आला नाही. १८२५मध्ये त्याने कंपनीच्या नोकरीचा राजीनामा दिला. . १८२५मध्ये जेन कॅथरिन या तरुणीशी त्याने विवाह केला. तिची काही संपत्ती त्यास मिळाली. म्हणून उर्वरित आयुष्य त्याने आपली संपत्ती व शेती यांची देखभाल करण्यात घालविण्याचे ठरविले.

एल्फिन्स्टनच्या आज्ञेप्रमाणे त्याने ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध घेऊन १९ जुलै १८१९ रोजी मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचे कार्य अंगीकारले. थोड्याच अवधीत एल्फिन्स्टनच्या अनुमतीने त्याने लेखनकार्यास आरंभ केला. सातारचे महाराज तसेच अनेक संबंधित सरदार, सरदेशमुख, देशपांडे आणि आदिलशाही, निजामशाही येथील तवारिखा व मराठी बखरी तसेच पत्रे जमवून माहिती गोळा केली. यामध्ये त्यास बाळाजीपंत नातू यांचे फार सहाय्य झाले. हा सर्व इतिहास त्याने एल्फिन्स्टन, ब्रिग्झ, व्हॅन्स केनेडी, विल्यम अर्स्किन, बाळाजीपंत नातू यांना दाखविला व मसुदा तयार केला (१८२२).

जॉन मरे पब्लिशर्स लि. कंपनीने या पुस्तकाचे 'मोगल सत्तेचा ऱ्हास आणि ब्रिटीश सत्तेचा उदय' असे नामकरण केल्यास छापू म्हणून कळविले. तेव्हा मला मराठ्यांचाच इतिहास केवळ सांगावयाचा आहे, असे बाणेदार उत्तर देऊन त्याने स्वखर्चाने लाँगमन्स लि. कंपनीकडून १८२६मध्ये हिस्टरी ऑफ द मराठाज हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. या व्यवहारात त्यास त्या वेळी दोन हजार पौंड खर्च आला. त्यापैकी तीनशे पौंड कसेबसे वसूल झाले. १९२१पर्यंत या ग्रंथाच्या सहा आवृत्या निघाल्या.

१८२९मध्ये कॅ. डेव्हिड केपेन व बाबा साने यांनी या ग्रंथाचे मराठ्यांची बखर या शीर्षकाने मराठीत भाषांतर केले. त्याच्याही सहा आवृत्या निघाल्या. त्याच्या ग्रंथावर प्रथम कुठेच समीक्षण आले नाही व टीकाही झाली नाही, मात्र त्याच्या हिस्टरी ऑफ द मराठाज या ग्रंथावर सडेतोड टीका केली. तथापि, मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचा त्याचा प्रयत्न सर्वांनी मान्य केला.

एडन येथे स्थायिक झाल्यावरही त्याचा प्रतापसिंह व एल्फिन्स्टन यांच्याशी प्रदीर्घ काळ पत्रव्यवहार चालू होता. सातारच्या राजाची पदच्युती आणि राज्य खालसा (१८४८) या संबंधीची ब्रिटिश नीती त्याला आवडली नाही **-अ. रा. कुलकर्णी**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# स्ट्रॉबेरीच्या पानांचाही होतो शरीराला फायदा

सर्वसाधारणपणे १०० रुपयांचा वाटा अशी मिळणारी लाल, रसाळ स्ट्रॉबेरी सगळ्यात आधी डोळ्याला भावते. स्ट्रॉबेरीचे असंख्य फायदे हे सर्वमान्य आहेत, फक्त स्ट्रॉबेरीच नव्हे; तर त्याची पानंसुद्धा आरोग्यासाठी खूपच गुणकारी ठरू शकतात. स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये पॉलिफेनॉल हे अँटिऑक्सिडंट व व्हिटॅमिन सी असते. याव्यतिरिक्त ते इतर पोषक तत्वांनी भरलेले असतात जे आपल्या शरीरासाठी फायदेशीर असतात. स्ट्रॉबेरीच्या पानांचे काही फायदे खालीलप्रमाणे...



व्हिटॅमिन आणि मिनरल बूस्ट: स्ट्रॉबेरीची पाने व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहेत, जी रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक आहे. याशिवाय स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये जीवनसत्त्वे ए, के, लोह आणि कॅल्शियम सारखी खनिजे देखील असतात.

अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस: स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटिऑक्सिडंट्ससुद्धा मुबलक प्रमाणात असतात. हे अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सचा सामना करण्यास मदत करतात आणि आजारांचा धोका कमी करू शकतात.

रक्तातील साखरेचे नियमन : काही अभ्यासात असे दिसून आले आहे की, स्ट्रॉबेरीची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतात.

पचनाला सहाय्य : स्ट्रॉबेरीचे पाने आहारात फायबर जोडतात, ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. तसेच पोट स्वच्छ होण्यासही हातभार लागू शकतो.

स्ट्रॉबेरीच्या बऱ्याच जातींची पाने खाण्यायोग्य असतात, परंतु वापरासाठी एकही 'सर्वोत्तम' प्रकार नाही. पानांवरील कीटकनाशकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सेंद्रिय, ताज्या स्ट्रॉबेरीची निवड करा.

फळांच्या तुलनेत स्ट्रॉबेरीच्या पानांची चव वेगळी असते. मल्होत्रा पुढे सांगतात, त्यात किंचित तुरट, गोड, चव असते तर पोत पालकापेक्षा पातळ असू शकतो. त्याचा वापर स्वयंपाकात कसा करता येईल हे पाहूया..

सॅलड्स : स्ट्रॉबेरीची बारीक चिरलेली पाने सॅलडमध्ये उत्तम चवीची जोड करू शकतात.

चहा आणि पेये : स्ट्रॉबेरीची पाने हर्बल चहासाठी उत्तम ठरतात.

# अर्ध्याहून अधिक भातशेती रुजलीच नाही!

**महाड : प्रतिनिधी**



या वर्षी मे महिन्यातच पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना भात पेरणीला उसंतच मिळाली नाही. त्यामुळे भर पावसात अनेकांनी भात बियाणे पेरले आणि त्यामुळे भात बियाणे रुजण्यास खूप उशीर झाला. पेरलेल्या भात बियाणातून अर्ध्याहून अधिक बियाणे रुजलेच नाही. यामुळे शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहे.

शेतात साचलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना नवीन भात बियाणे पेरावे लागले. भात लावणी करण्यासाठी भाताची रोपे नसल्याने शेतकरी भात लावणी करणार कसा हा प्रश्न त्याच्यासमोर पडला आहे. सध्या महाड तालुक्यात ५० टक्के शेती ही ओसाड राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना शासनाकडून चांगल्या मदतीची प्रतीक्षा आहे.

यंदा मे महिन्यातच पाऊस सुरू झाला. यामुळे पेरणी उशिरा झाली आणि दलदलीच्या ठिकाणी पेरलेले भात पाण्यामुळे रुजलेच नाही. त्यामुळे शेतकऱ्यासमोर लावणी कशी करावी हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. महाड तालुक्यातील काही भागात ला

वणीला सुरवात झाली असली तरी निम्याहून जास्त शेती अद्याप ही ओसाड आहे या शेतीला लागवड करण्यासाठी शेतकऱ्याकडे भाताची रोपे नसल्याने शेतकरी चिंतेत आहे. त्यामुळे शेतकरी लावणी अगोदरच अडचणीत आला आहे.

गेल्या वर्षी आठ हजार हेक्टर शेत जमीनिवर लागवड झाली होती. यावर्षी मात्र बहुतांश भात शेती ही पडीक राहणार आहे. गतवर्षी शासनाने ज्या शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाले होते त्यांना हेक्टरी शासनाकडून १३६०० भरपाई देण्यात आला होते जवळपास ४००० शेतकऱ्यांना भरपाई देण्यात आली होती. शासनाकडून मिळणारी ही भरपाई शेतकऱ्यांसमोर तुटपुंजी आहे. यंदा झालेल्या नुकसानीबाबत कृषी विभाग आणि महसूल विभाग यांच्याकडून घर गोठे नैसर्गिक आपत्ती होणारे नुकसान आणि शेतीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे यंदा महाड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी शासनाने नुकसानी प्रमाणे मदत जाहीर करावी

## कोयना एक्सप्रेसमध्ये चढताना महिलेचा अपघाती मृत्यू

**कर्जत :** कर्जत रेल्वे स्थानकात रविवारी सकाळी कोयना एक्सप्रेस मध्ये चढताना एक महिला पाय घसरल्याने फलाट व गाडी यामधील पोकळी मध्ये पडली. ती गंभीर जखमी झाल्याने उपचारासाठी नेली असता डॉक्टरांनी तीला मृत घोषित केले.रविवारी सकाळी दहा वाजून पन्नास वाजण्याच्या सुमारास रफत जहान शेख ही महिलाडब्यात चढत असताना त्यांचा पाय घसरला आणि त्या फलाट आणि गाडी यामधील पोकळीमध्ये पडल्या.

### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहिर सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्यत विभागातील विविध कामांचे अदांजपत्रक तयार करण्याकरीता संबंधीत Manufacturer/Dealer/Contractor कडुन वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

सदरची माहीती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३११/३१७/२०२५**
**दिनांक :- ०७/०७/२०२५**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

# विजेचा शॉक लागून दोन बैल ठार; मंत्री गोगावलेंकडून मदत

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव तालुका तिलोरे येथील शेतकरी शेतीसाठी नांगरायला बैल नेत असताना दोन बैलांना विजेचा शॉक लागून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. भात लावणीच्या हंगामात बैल हिरावल्याने शेतकरी कुटुंब धक्क्यात सापडलं. ही बाब समजताच रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी तातडीने या शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत रोख २५ हजार रुपये रक्कम देऊन मदतीचा हात पुढे केला

तिलोरे येथील शेतकरी संजय बेंदुगडे यांचे २ बैल शेतामध्ये नांगरणीसाठी जात असताना विजेच्या खांबामधील विद्युत प्रवाहाच्या झटक्याने जागीच ठार झाले. दि. ५ जुलै रोजी मृत पावलेल्या या २ बैलांचे फोटो सोशल मीडियावर पाहताच प्रत्येकाचे मन हेलावून गेले. या दुर्दैवी घटनेची कल्पना महाराष्ट्र राज्याचे मंत्री भरतशेठ गोगावले यांना देताच २४ तासांच्या आत त्यांनी संकटग्रस्त शेतकरी संजय बेंदुगडे यांच्या तिलोरे येथील निवासस्थानी भेट देत या घटनेबाबत विचारपूस केली व बेंदुगडे परिवाराला धीर दिला. तेथूनच महवितरणच्या अधिकाऱ्यांना फोन लावत तातडीने सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकरी कुटुंबाला भरपाई मिळवून द्या अशी सूचना केली. यावेळी तिलोरे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२- ७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**जाहीर निविदा**

माझी वसुधंरा अभियान अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबवणेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेकामी, नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी त्यांच्या सिलबंद निविदा पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दिनांक १५/०७/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | दर (GST सह) | कामाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माझी वसुधंरा अभियान अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबवणेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत. | | | कार्यादेश दिल्यापासून काम पूर्ण होईपर्यंत | रू. ९७००/- | रू. ५९०/- (GST सह) |
| | घटक | प्रमाण/ संख्या | | | | |
| | ब्रँड ॲम्बेस्टर | २ | | | | |
| | इन्फ्लुएन्सर अपील व्हिडिओ | २० | | | | |
| | क्रिएटिव्हडिझाईन | ३० | | | | |
| | शॉर्टफिल्म स्क्रिनिंग | ५० | | | | |
| | Walkathon | १० | | | | |
| | शाडूमूर्ती कार्यशाळा | १० | | | | |
| | सेल्फीबुथ | ५ | | | | |
| | सेमिनार आयोजन | १० | | | | |
| | प्रतिज्ञा | ५००० | | | | |
| | स्वयंसेवक मानधन / किट | ५० | | | | |
| | डॉक्युमेंटेशन (फोटोग्राफी) | All events | | | | |
| | | | एकूण दर = | | | |

निविदेच्या अटी व शर्ती आणि इतर माहिती पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात पहावयास मिळेल.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३१२/३१८/२०२५**
**दिनांक :- ०७/०७/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

### महाराष्ट्र शासन

**आधारसामग्री, संकलन व नियोजन व जलविज्ञान मंडळ,**
**नाशिक अंतर्गत, कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, कळवा (ठाणे)**
**पत्ता :- सहकार विद्यालय समोर, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा (ठाणे) ४००६०५**
**ई-मेल :-** eehpthn@rediffmail.com **दूरध्वनी क्रमांक** ०२२-२५४२६०५३
(Recall-२) **फेर निविदा-२ ई-निविदा सुचना क्र ०१ सन २०२५-२०२६**
Main Portal: http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता जलविज्ञान प्रकल्प विभाग कळवा (ठाणे) महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत सविस्तर निविदा सूचनां व ई निविदाबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलका वर उपलब्ध आहे निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास hup://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळवणेत येईल.

**कामाचे नांव-:** Real Time Data acquisition System(RTDAS-3) For West Ward Flowing Rivers Basins in Konkan Region to Control Flood
**जिल्हा :-** ठाणे
**निविदा अंदाजित किंमत :-** रु. २,८०,३२०००/-
**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक ०८/०७/२०२५ ते दिनांक - १५/०७/२०२५
**ई-निविदा उघडणे :-** दिनांक १६/०७/२०२५ वेळ १७.०० वा.
**स्थळ:** कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय
* संकेतस्थळावर प्रसिध्द होणा-या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने संबंधित कार्यालयात उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही *

**जा. क्र. जविप्रविक / लेशा -२/९६४/२०२५**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग,**
**कळवा (ठाणे) यांचे कार्यालय,**
**दिनांक :- ०७/०७/२०२५**

**सही/-**
**श्रीमती वै, रा. कुरणे**
**कार्यकारी अभियंता,**
**जलविज्ञान प्रकल्प विभाग,**
**कळवा (ठाणे)**

मा. पवार मॅडम कोर्ट **ॲड. रोशनी सु. ठाकूर**

### जाहिर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे कोर्टात**

दि.ची. अर्ज क. ४३१/२०२५
नि. ७/ड
ने ता. १५/०७/२०२५

**श्रीम. अर्चना आत्माराम कदम व इतर** ...अर्जदार

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, कै. आत्माराम महादेव कदम यांचा मृत्यू दि. १७/०९/२०२३ रोजी, मु. लाभ एव्हेन्यु को. ऑप. हौ. सोसायटी, २ रा माळा, डी -२०१, फ्लॉट- २० ए, सेक्टर ११, रोडपाली कळंबोली येथे झाले आहे अर्जदार **१. अर्चना आत्माराम कदम २. आराध्य आत्माराम कदम व ३. वासंती महादेव कदम** यांनी त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मे दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज क. ४३१ /२०२५ हा अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.न | मौजे | फ्लॅट नं/विंग | मजला | इमारतीचे नाव | सेक्टर | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कळंबोली | २०१/डी बिंग | २ रा | लाभएव्हेन्यु को. ऑप. हौ. सोसायटी | ११ | २० ए. | ६४.२३ चौ.मी. + ४.९२ चौ.मी. |

सदर चौकशी अर्जास कोणाचीही हरकत, हक्क व अधिकार असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून एक महिन्याचे आत किंवा दि १५/७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर बेलापूर यांचे न्यायालयात आपल्या हरकती योग्य त्या पुराव्यासह सादर करव्यात. सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून योग्य त्या मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून सदरील कोर्ट अर्ज दार यांस वारस दाखला देईल याची नोंद घेण्यात यावी.

आज दि. २६/०६/२०२५ रोजी आमचे सहीने मे. कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-** क. लिपीक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल

शिक्का

**सही/-** सह. अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या इर्तीजा अल्लादिन खान मयत तर्फे वारस **श्री. झमर इर्तीजा खान, श्री. रफी इर्तीजा खान, श्री. बाडर इर्तीजा खान, श्री. शफी इर्तीजा खान, मुशार्रात राशीद अली खान, जमरत सगीर अहमद खान,** या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- वावंजे, ता- पनवेल, जिल्हा- रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र - हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १५६ | १ | ०-९२-३० पो.ख. ०-०३-५० | ७.३७ |
| | | एकूण ०-९५-८० पैकी वर नमुद भोगवटादार यांच्या मालकीची व ताबेक्बजातील ०-३६-३० पो.ख. ०-०३-५० एकूण ०-३९-८० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०८/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली,
उरण, रायगड पिन कोड- ४००७०२, मोबाईल नं. ७६६६०१०२९३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे - नांदगाव, ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| नांदगाव | समिर हरिचंद्र पाटील<br>नितीन हरिचंद्र पाटील<br>संगिता दिलीप फडके<br>सरोज संतोष म्हसकर<br>सुनिता प्रदिप फडके<br>**कै. गंगूबाई बाळाराम चोरघे तर्फे वारस**<br>**संजय नारायण चोरघे**<br>महादीबाई गोंविद पाटील<br>गोपीनाथ काना पाटील<br>सखाराम काना पाटील<br>दयाराम काना पाटील<br>ललिता बाळाराम पाटील<br>प्रशांत बाळाराम पाटील<br>कविता सुभाष म्हात्रे<br>सविता प्रकाश ठोकल<br>रुपेश बाळाराम पाटील | २६ | २/ड | ०-३७-९०<br>०-०२-६० | ८-८१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांच्या** आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०७/०७/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**
ऑफिस नं.१३५, पहिला मजला, नगर पालिका कॉम्पलेक्स, छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळयाच्या पुढे, पनवेल,जि. रायगड-४१०२०६, मोबाईल. ९३२४३७५५०२

### पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**
**दिनांक : 14.07.2025 (सोमवार)**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शौक्षिक वर्ष 2025-26 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शौक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers)<br>**भौतिक विज्ञान**/PHYSICS | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained Graduate Teacher)<br>**संस्कृत** / SANSKRIT<br>**हिन्दी** / HINDI<br>**अँग्रेजी** / ENGLISH | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए) एवं बी.एड डिग्री |
| **प्राथमिक शिक्षक** (PRIMARY TEACHER) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से सम्बंधित विषय में ५०% अंकों के साथ १२वीं पास एवं डी.एड. डिग्री और सी.टी.ई.टी |
| **प्रशिक्षक :**<br>SPECIAL EDUCATOR | विशेष शिक्षा में स्नातक की डिग्री और बी.एड. या विशेष शिक्षा में डिप्लोमा/स्नातकोत्तर डिप्लोमा के साथ बी.एड. (सामान्य)। भारतीय पुनर्वास परिषद (RCI) द्वारा मान्यता प्राप्त समकक्ष योग्यता। |

**साक्षात्कार दिवस :** 14.07.2025 **(सोमवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/-**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**

## निवडक

### कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार ८ जुलै, २०२५ रोजी दुपारी १२ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन येथे आयोजित केली आहे. या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग प्र.तहसिलदार, (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### कुकशेतमध्ये आषाढीनिमित्त सोहळा



**नवी मुंबई** : कुकशेत गाव येथे सालाबादप्रमाणे यावर्षी देखील आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विठू-माऊलीचे दर्शन राज्याचे वने मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी घेतले. माजी आमदार संदीप नाईक यांनीदेखील दर्शन घेत विठ्ठल रखमाईची पूजा केली. या वेळी माजी नगरसेवक सुरज पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### सानपाड्यात प्रतिपंढरपूर आषाढी वारी



**नवी मुंबई :** साई भक्त सेवा मंडळ व साईभक्त महिला फाउंडेशन यांच्यातर्फे सानपाड्यात प्रतिपंढरपूर आषाढीवारी दिंडी सोहळा बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या उपस्थितीत विठ्ठल भक्तांनी मोठया भक्तीभावाने साजरा केला. प्रतिपंढरपूर आषाढी वारी दिंडी सोहळ्याचे आयोजन साईभक्त सेवा मंडळ व साई भक्त महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा शारदा आमले व भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी केले होते. या वेळी नाना शिंदे, सुधीर आंग्रे, अविनाश टेंबेकर, वसंत बावकर, वैशाली व्हावेकर, मंगलताई वाव्हळ, किशोरीताई जगताप, स्वाती जाधव, विनिता नाईक, राजेंद्र शेडगे, जितेंद्र खानराते, विश्वास कणसे व युवा फाउंडेशन सहकारी साईराज पराडकर, साई काळे तसेच असंख्य वारकरी बांधव उपस्थित होते.

# निसर्ग संवर्धनासाठी नागरिकांचा पुढाकार

## इंद्रायणी डोंगरावर फळझाडांची लागवड



**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर गावातील डोंगर परिसरात उरण वनपरिक्षेत्र आणि निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली इंद्रायणी डोंगरावर शनिवारी साडेचार हजार फळझाडांची लागवड आली आहेत. तर काही दिवसात, वनविभागाच्या सहकार्याने चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या आक्कादेवी डोंगरावरही साडेपाच हजार झाडे लावून, एकूण दहा हजार वृक्षे लावण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी वनविभागाला चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या लढ्याचे महत्त्व पटवून देऊन, चिरनेर गावाच्या डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यासाठी साडेपाच हजार झाडांची मागणी केली आहे.

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनाही याबाबत निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी पत्रव्यवहार केला आहे. चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या स्वातंत्र्य लढ्याला २५ सप्टेंबर २०३० साली शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. जंगल सत्याग्रहाच्या शतक महोत्सवाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, श्रीधर मोकल यांनी २०२२ पासून इंद्रायणी डोंगरावर फळझाडे लावण्याची सुरुवात केली आहे. आजपर्यंत आंबा, जांभूळ, रिठा, मोह, काजू, सिताफळ, फणस अशी विविध प्रकारच्या साडेचार हजार फळझाडांची लागवड त्यांच्या पुढाकाराने करण्यात आली असून, त्याचे संवर्धनही ते स्वखर्चाने करत आहेत. उद्देश एवढाच की निसर्गाचा होत चाललेला ऱ्हास आणि वन्य प्राण्यांचे धोक्यात आलेले जीवन यासाठी त्यांचा हा साजेसा प्रयत्न आहे.

जंगले नामशेष झाली तर येथील जीवसृष्टीवर त्याचा मोठा परिणाम होणार आहे. दरम्यान ५ जुलैपासून श्रीधर मोकल व वनपरिक्षेत्र उरण यांच्या नियोजनाखाली वृक्षरोपणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या वेळी उरण वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे, वन परिमंडळ अधिकारी दिविलकर, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल, वनरक्षक अनिकेत सूर्यवंशी, भूषण साळुंखे, आशा वाले, ज्ञानेश्वर गायकवाड, वंदना बोरसे, वनपाल चंद्रकांत पाटील, श्री खाडे तसेच ठेकेदार राजेंद्र खारपाटील, सरपंच भास्कर मोकल,लोहार समाज अध्यक्ष कृष्णा व्यापारी, प्राथमिक शाळा शिक्षण समितीचे माजी अध्यक्ष प्रवीण म्हात्रे, फ्रेंड्स ऑफ नेचरचे संस्थापक अध्यक्ष जयवंत ठाकूर, विवेक हुदळी, निकेतन ठाकूर, ऋषिकेश म्हात्रे, दिनेश चिरनेरकर, गोवर्धन पाटील तसेच वन कर्मचाऱ्यांसह वन्यजीव संरक्षण संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

## संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे वृक्षदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे आषाढी एकादशी आणि वृक्षरोपण असे औचीत्य साधून वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व, उद्देश लक्षात घेऊन झाडे लावणे आणि त्यांच संगोपन करणे हा संदेश देणे महत्वाचे आहे.

लोकांनी झाडे न तोडता जास्तीत जास्त झाडं लावून पर्यावरणाचे संरक्षण करणे किती महत्वाचे आहे हेही यांतून सांगण्याचा प्रयत्न गेले १३ वर्ष संवेदना संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करून महिला करत आहेत. या वर्षी संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे पनवेल ट्रेकर्स ग्रुपच्या मदतीने आदई डोंगरावर ५४ देशीवृक्षांची लागवड करण्यात आली.

यामध्ये पेरू, जांभूळ, आवळा, चिंच, आंबा, पिंपळ, वड, उंबर, कडुलिंब इ. देशी वृक्षाची लागवड करण्यात आली. विठूरायाच्या गजरात डोंगरावर चढाई चालू केली. निसरडा रस्ता, एवढिशी वाट आणि चढ चढत जाणे त्यात आध्ये मध्ये पाऊस हजेरी लावत होता आणि चढ चढत हातात झाडे घेऊन डोंगरावर चढणे आमच्यासारख्या पन्नास-साठीच्या महिलांना थोडे आव्हानात्मक होते, पण एकमेकींच्या साथीने सहाय्याने तो ही पल्ला महिलांनी पार पडला.

भक्तीगीते, अभंग गात विठूरायाच्या गजरात आजचा हा एकादशीचा दिवस निसर्गसेवा हीच ईश्वरसेवा याच भावनेतून साजरा करणे हा आम्हा सर्व सख्यांना वेगळीच अनुभूती देणारा ठरला. पंढरपूरी न जाताही भुमातेच्या चरणी नतमस्तक होऊन तिच्या सेवेला वाहिलेला हा दिवस सार्थकी लागला. अश्या भावना संवेदना संस्था अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी व्यक्त केल्या.



## तुळशीच्या पानावर विठ्ठलाचे चित्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथे राहणाऱ्या आठवी इयत्तेतील १३ वर्षीय नील कमलेश चौधरी याने तुळशीच्या पानावर विठ्ठल साकारले आहे. त्याच्या या कलाकृतीचे कौतुक होत आहे.

नील चौधरी याला पेंटिंगची आवड असून त्याने आत्तापर्यंत शिवाजी महाराजांची स्टोन पेंटिंग, विठ्ठल रखुमाई, गणपती, नानासाहेब धर्माधिकारी, रोनाल्डो यांच्यासह अनेक चित्रे काढली आहेत. याबद्दल त्याला अनेक पारितोषिके देखील मिळाली आहेत. ६ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्ताने नील चौधरी याने तुळशीच्या पानावर विठ्ठलाची प्रतिकृती साकारली.



आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या दर्शनाला काही भाविक जाऊ शकत नाहीत, मात्र आपल्या कलेच्या माध्यमातून विठ्ठल भक्तांना आणि वारकऱ्यांना एक वेगळा आनंद देण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. जवळपास दोन ते अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर त्याने ही कलाकृती साकारली.

## लोटस लेक वाचवण्यासाठी नागरिक एकत्र

### गृहनिर्माण संस्थांची पत्रे मुख्यमंत्र्यांना पाठवली जाणार

**नवी मुंबई : बातमीदार**

७० ते ८०हून अधिक पर्यावरणाविषयी जागरूक नागरिक पुन्हा एकदा लोटस लेक, सेक्टर २७, नेरूळ येथे जमले होते. या महत्त्वाच्या पाणथळ जागेचे संरक्षण करण्यासाठी सलग पाचव्या रविवारी शांततापूर्ण आंदोलन केले. या वेळी पुन्हा एकदा एकदोन येथे टाकलेला कचरा, डेब्रिज तातडीने काढावे, अशी मागणी करण्यात आली तसेच याविषयी अनेक गृहनिर्माण संस्थांनीदेखील पाठिंब्याचे पत्र दिले आहे. ही सर्व पत्रे मुख्यमंत्र्यांना पाठवली जाणार असल्याचा निर्णय या वेळी एकमतेमताने घेण्यात आला.




चळवळीतील वरिष्ठ सदस्यांनी नवीन सहभागींना तलावाचे पर्यावरणीय महत्त्व आणि त्याचे संवर्धन करण्यासाठी केलेल्या मागील प्रयत्नांची माहिती दिली. उत्साहवर्धकपणे, जागरूकता पसरत आहे. अनेक गृहनिर्माण संस्थांनी लोटस लेकचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या वेळी नागरिकांसह, महाविद्यालयीन विद्यार्थ्यां नी उपस्थिती दर्शविली. नागरिकांनी विविध फलक झळकावत या पाणथळ जागेला संरक्षित करून त्याचे सुशोभिकरण करण्याची मागणी केली.



**उरण :** द्रोणागिरी येथील महाराष्ट्र स्वीट्सचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. या वेळी गणेश सेवक व भगवान सेवक यांनी सर्वांचे स्वागत करून आभार मानले. उद्घाटनावेळी माजी नगरसेवक कौशिक शाह, काँग्रेसचे नेते महेंद्र घरत, मिलिंद पाडगावकर, उद्योजक राजेंद्र पडते, हस्तीमल मेहता, आर्किटेक तनसुख जैन, रमेश ठाकूर, उद्योजक सुनील पेडणेकर, मार्तंड नाखवा, हितेश शाह, मनन पटेल, अजित भिंडे, गणेश शाह, मधुकर पेडणेकर, चंद्रकांत घरत, कनैया सेवक, दीपक कोळी, अभिषेक जैन, पुरषोत्तम सेवक, दिनेश पवार आदी उपस्थित होते.

## भारत विकास परिषदेतर्फे पनवेलमधील डॉक्टर्स, सीए यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर्स डे आणि सीए डेचे औचित्य साधून पनवेलमधील सेवाव्रती, निष्णात डॉक्टर्स, तसेच समाजबांधिलकी जपणारे सीए-चार्टर्ड अकाउंटन्स, यांना भारत विकास परिषद, पनवेल शाखेच्या वतीने रविवारी ज्या वर्षीचा आरोग्यरत्न पुरस्कार आणि लेखारत्न पुरस्कार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यंदाचे हे या पुरस्काराचे दुसरे वर्षे आहे.

पुरस्कारामधे सीए एकनाथ पाटील आणि सीए अभय





साखळकर यांना लेखारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला तर डॉ. भरतकुमार पलण, डॉ. घनश्याम वैष्णव, डॉ. रंजना, डॉ.मंगलसिंग राजपूत यांना आरोग्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, सीए मुकुंद चितळे आणि डॉ. अभिजीत सोनावणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भिक्षेकऱ्याचा डॉक्टर अशी आगळेवेगळी ओळख असणारे डॉ. अभिजित सोनावणे यांची मुलाखत या वेळी डॉक्टर समिधा गांधी यांनी घेतली. दरम्यान, कार्यक्रमात सुरूवातीला आषाढी एकादशीनिमित्त संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या आयुष्यावर आधारित गाऊ कथा तुकोबांची.. ह्या सतिश काळे लिखित आणि डॉक्टर सलिल लाटे दिग्दर्शित संगीतमय कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. त्यानंतर भारत विकास परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष सुबोध भिडे यांनी संस्थेच्या उपक्रमांचा आढावा घेतला.

खांदा कॉलनीमधील डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमी स्कुल मध्ये झालेल्या या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भारत विकास परिषद, मुंबई-कोकण प्रांत अध्यक्ष अविनाश धर्माधिकारी मोहन हिन्दुपुर, शेखर बर्वे, पद्मजा कुलकर्णी यांच्याश सीए, डॉक्टर्स आणि संस्थेचे सभासद असे एकूण २५० मान्यवर उपस्थित होते.

## ‘रंगकर्मींनी सर्वप्रथम रंगभूमी आणि नाट्यशास्त्राचा आशय समजून घ्यावा’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनेता अथवा अभिनेत्री होण्याआधी रंगकर्मींनी सर्वप्रथम रंगभूमी आणि नाट्यशास्त्राचा आशय नीट समजून घ्यावा. आणि मग आपले पाऊल रंगभूमीवर टाकावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी धनंजय सरदेशपांडे यांनी येथे केले.

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे व नाट्य परिषद शाखा पनवेलचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिनय



प्रशिक्षण शिबीर, खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात 'अभिनय 'या विषयावर ते मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना पुढे ते म्हणाले, आपण स्वतःचा शोध नाटकाद्वारे घेत असतो. त्याच बरोबर आपली चौफेर नजर तयार करण्याचं काम अशा प्रकारच्या शिबिरातून होत असते. अभिनय म्हणजे काय, आवजाचा वापर कसा करावा, नाटक कसं पाहावं, नाटक कसं करावं ह्याच प्रात्यक्षिक त्यांनी शिबिरार्थींना दिले. तसेच भरत मुनींचे नाट्यशास्त्र आणि त्यांचे सिद्धांतही प्रशिक्षणार्थींना त्यांनी समजून सांगितले.

या वेळी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, नाट्य परिषदेच्या सहकार्यवाहक स्मिता गांधी यांच्या हस्ते श्री. सरदेशपांडे यांना एक सन्मानचिन्ह भेट देऊन सत्कार करण्यात आला.



**पनवेल : भाजप भटके विमुक्त जमाती सेलचे पनवेल तालुका मंडळ अध्यक्ष निलेश दराडे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल तालुका उत्तर मंडळचे अध्यक्ष दिनेश खानावकर, गुळसुंदे जि.प. अध्यक्ष अविनाश गाताडे, पनवेल पश्चिम अध्यक्ष रूपेश धुमाळ, माजी सरपंच सुनील माळी, अक्षय पवार, उरण विधानसभा प्रचारप्रमुख प्रवीण काळबागे, देवेश ढवळे, प्रतिक भोईर, प्रगत कडू, तोंडे आदींनी शुभेच्छा दिल्या.**



# श्रीवर्धनमध्ये छुप्या पद्धतीने गुटखा विक्री?

**श्रीवर्धन : संतोष चौकर**

मागील काही दिवसांपासून श्रीवर्धन शहरामध्ये व तालुक्यामध्ये गुटख्याची खुले आमविक्री अशा मथळ्याच्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या. त्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन, त्याचप्रमाणे स्थानिक पोलिसांनी गुटखा विक्री करणाऱ्यांना शोधण्यासाठी छापेमारी केली, परंतु पोलिसांना छापेमारीमध्ये कोणत्याही प्रकारची गुटख्याची पाकिटे आढळून आली नाहीत. असे असले तरी श्रीवर्धनमध्ये रस्त्यावर गुटख्याची रिकामी पाकिटे सापडत असल्याने छुप्या पद्धतीने गुटखा विक्री होत असल्याची चर्चा श्रीवर्धनमध्ये सुरू आहे.

गुटखा विक्रीच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी शहरातील काही पत्रकारांना बोलावून तुम्ही कोणत्या पुराव्यांच्या आधारे बातम्या प्रसिद्ध केल्यात? याबाबत विचारणा केली होती. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत आणि त्यांना कोणत्याही ठिकाणी अवैध धंदे किंवा अवैध प्रकार सुरू असतील तर त्याबाबत बातमी टाकण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. प्रशासनाकडून गुटखा विक्री करणाऱ्यांवर छापेमारी करून सुद्धा कोणत्याही प्रकारचा गुटखा आढळून आला नाही, असे पोलीस प्रशासनाचे म्हणणे आहे.

जर का गुटख्याचा साठा आढळून आला नाही. तर मग श्रीवर्धन शहरांमध्ये व ग्रामीण भागामध्ये रस्त्यावरती रस्त्याच्या कडेला गुटख्याची रिकामी पाकिटे कशी सापडतात, असा प्रश्न आता नागरिकांमधूनच उपस्थित केला जाऊ लागला आहे. विश्वसनीय वृत्तानुसार श्रीवर्धन परिसरात आता गुटख्याची विक्री चढ्या भावाने व अत्यंत छुप्या पद्धतीने होत असल्याची बातमीसमोर आली आहे. श्रीवर्धनमध्ये गुटखा विक्री करणाऱ्यांना एक मोठा व्यापारी गुटखा पुरवतो.

यावर पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची छापेमारी केली जात नाही. किरकोळ विक्रेत्यांना पकडण्यापेक्षा पोलिसांनी त्यांना गुटखा पुरवणाऱ्या म्होरक्याच्या मुस्क्या आवळल्या, तर हा प्रकार कायमचा बंद होऊन जाईल. गुटख्या बाबत विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनामध्येदेखील चर्चा झाल्याची गोष्ट समोर आली आहे. प्रशासनाने गुटखा विक्री बंद असल्याचा दावा केल्यामुळे गुटखा खाऊन फेकलेली रिकामी पाकिटे कशी मिळतात? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.



## निवडक

### रोहा शहरात वृक्षारोपण कार्यक्रम



**रोहे :** खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन रोहा शहरात करण्यात येत आहे. महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी भेट दिली. या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी गटनेते महेंद्र गुजर, महेश कोल्हटकर, शहर अध्यक्ष अमित उकडे, अलिम मुमेरे, अजित मोरे, चंद्रकांत पार्टे, समिरभाई सकपाळ, महेश सरदार, माझ सवाल, रविंद्र चाळके, नितीन पिंपळे, वसंत कोठारी, मयुर दिवेकर, निलेश शिर्के, मिहिर शृंगारपुरे, मनिष यादव सह शहरातील माजी नगरसेवक, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्तित होते.

### बामणगाव येथे एकादशी पर्व



**माणगाव :** आषाढी एकादशी निमित्ताने श्री संत तुकाराम महाराज व विठ्ठल रखुमाई मंदिर बामणगाव येथे एकादशी पर्व कार्यक्रम सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या भक्तिमय कार्यक्रम सोहळ्यास सर्व ग्रामस्थ, सन्माननीय मुंबईकर, महिला भाविक भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीच्या काकड आरती, प्रवचन व भजन रुपी कार्यक्रमांतून मिळणाऱ्या श्रवणरूपी श्रीच्यां, श्रीसंत विचारांच्या महिमेचा तसेच श्रीदर्शन व तीर्थप्रसादाचा भाविक भक्तगणांनी लाभ घेतला. कार्यक्रम भक्तीमय वातावरणात झाले.

### नागोठण्यात तुळशी रोपांचे वाटप

**नागोठणे :** खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आषाढ़ी एकादशीचे औचित्य साधुन नागोठणे येथील श्री ज्ञानेश्वर मंदिर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेतृत्व तथा प्रियदर्शनी वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष प्रथमेश काळे व नागोठणे ग्रामपंचायत सदस्या पुनम काळे यांनी ग्रामस्थांना तुळशी रोपांचे वाटप केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, विलास चौलकर, प्रथमेश काळे, पूनम काळे, महिला नेत्या दिपाली टके, सुजाता जवके, आशा शिर्के, प्रतिभा तेरडे, श्वेता चौलकर, नागोठणे ग्रामपंचायत माजी सदस्या कल्पना टेमकर, कल्पना शहासने, संजीवनी हडपे, सुनिता ईप्ते, अनिता पवार, प्रकाश मोरे, राजेश पिंपळे, मधुकर महाडिक, निलेश म्हात्रे, रतन हेंडे, भारत भोय, अविनाश बामणे, राजुशेठ मोदी आदी उपस्थित होते.

### ओमकार शिर्के बनला सीए

**नागोठणे :** रोहा तालुक्यातील कडसूरे ग्रामपंचायतीचे माजी



सरपंच भालचंद्र उर्फ भाई शिर्के आणि माजी सरपंच भावना शिर्के यांचा सुपुत्र ओमकार भालचंद्र शिर्के (वय २३) याने मे २०२५ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाऊंटंटची फायनल परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करून अत्यंत प्रतिष्ठेची चार्टर्ड अकाऊंटंट (सीए) ही पदवी प्राप्त केली आहे. त्यामुळे ओमकारचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. बारावीत असतानाच त्याने सीए अभ्यासक्रमाला सुरुवात केली. ओमकार याने सुरुवातीला काम करून अभ्यास केला व सर्व परीक्षा काळात १५ ते २० तास अभ्यास केला. अडी अडचणी वर मात करून त्याने हा टप्पा गाठला आहे.

### दीपक पालशेतकर यांना सेवानिरोप



**मुरुड :** जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस. ए. कनिष्ठ महाविद्यालय, मुरूड तर्फे प्रा. दीपक अनंत पालशेतकर यांची विहित वयोमाना प्रमाणे सेवापूर्ती झाल्याने त्यांना कार्यकारी मंडळ तथा शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचारी वृंदाकडुन निरोप देण्यात आला. या वेळी व्यासपीठावर जंजिरा विद्या मंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, ज्येष्ठ संचालक प्रमोद भायदे, उदय दांडेकर, विजय वाणी, सुशिला म्हात्रे, उत्कर्षा गुंजाळ, पी के आरेकर, प्रा. दीपक पालशेतकर, मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, प्रकाश मसाल, उदय गद्रे, दीपाली रोटकर, तोंडलेपाटील सर आदी उपस्थित होते.

# खालापुरात डंपरचालकाला धमकावणाऱ्या चौघांना अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील तांबाटी गावाच्या हद्दीत असलेल्या गोदरेज कारखान्यात माल घेऊन आलेला डंपर अडवून चालकाला जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याबद्दल तेजस उतेकर, अमोल बलकवडे, योगेश शिंदे आणि अशोक मरागजे यांना पोलिसांनी अटक केली आहे.

सय्यद गफार सय्यद दगडू याने दिलेल्या तक्रारीनुसार वरील चौघानी गैर कायद्याचे मंडळी जमून सय्यद याचा डंपर अडवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच त्याच्याकडील रॉयल्टी ची पावती खेचून घेतली. याबाबत डंपर चालक सय्यद यांनी गाडी मालकांला सदरचा प्रकार सांगितल्यानंतर खालापूर पोलीस ठाण्यात वरील चौघां विरोधात तसेच त्यांच्या तीन अनोळखी साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

तेजस, अमोल, योगेश आणि अशोक यांना शुक्रवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली असून शनिवारी न्यायालयात हजर केले असता चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी संतोष आवटी पुढील तपास करीत आहेत.

# महिलांच्या आरोग्याबाबत विशेष उपक्रम

**कर्जत : रामप्रहर वृत्त**



कर्जत चिंचवली येथे मासिक पाळी स्वच्छताविषयक सत्र नुकतेच अरिहंत फाउंडेशन, रायगड मेडिकल असोसिएशन आणि लाइट ऑफ लाईफच्या कर्जत टीम, महाराष्ट्र होमिओपॅथिक महिला डॉक्टर्स असोसिएशन यांच्या सहकार्याने स्पेशल चाईल्ड स्कूल, चिंचवली, कर्जत येथे मासिक पाळी आणि स्वच्छता या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर जनजागृती सत्र आयोजित केले.

या सत्राचे मार्गदर्शन डॉ. गीता राव हजारे (सहायक व्यवस्थापक, हेल्थकेअर व्हर्टिकल) आणि सारिका वेहले (नर्स, हेल्थकेअर कर्जत) यांनी केले. एकूण ४१ महिलांनी या सत्रात सहभाग घेतला, प्रश्न विचारले आणि मासिक पाळीशी संबंधित आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत उपयुक्त माहिती मिळवली. आयोजन प्रियांशी छाजेड़ (अरिहंत फाउंडेशन), बसंती जैन आणि तारादेवी सिक्वी (वाशी) यांनी केले.

# पोलादपूर येथे ताजिया मोहरम उत्साहात

**पोलादपूर : प्रतिनिधी**



इस्लामसाठी हसन व हुसेन यांच्या शहादत म्हणजेच कुर्बानीचे स्मरण ठेवण्यासाठी पोलादपूर शहरात ताजिया मोहरम उत्साहात साजरा करण्यात आला. मुस्लिम समाज बांधवांनी शहरात दोन ताबूतांची सवाद्य मिरवणूक काढून हसन व हुसेन यांच्याप्रती आदरभाव व्यक्त केला.

शनिवारी करबला म्हणजे हसन व हुसेन यांच्या शहादतचा दिवस म्हणून मध्यरात्रीच्या सुमारास ताबूतांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी खारकांड मोहल्ला शिवाजीनगर-गाडीतळ तसेच जामा मस्जिद कवींद्र परमानंद मठगल्ली या दोन मशिदींचे प्रमुख अनुक्रमे मुराद वारोसे आणि मुस्तुफा सावरकर, यासीन निगुडकर, बशीर निरगुडकर, सिराज लोखंडे, शफी निगुडकर, मंदार शेख, रफीक धामणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जमीर धामणकर, कादीर धामणकर, रियाज धामणकर, मुन्ना मुजावर, नासिर धामणकर तसेच मुस्लीम समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ताबूत विसर्जन मिरवणुकीतदेखील मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# खालापुरात ४०० वारकऱ्यांना 'इनरव्हील'ने दिले साहित्य

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब खोपोली तर्फे आपल्या खालापूर तालुक्यातील ४०० वारकरी तानाजी महाराज कर्णुक यांच्या मार्गदर्शना खाली एकादशी निमित्य पंढरपूर येथे बसने जातात त्या सर्व ४०० वारकऱ्यांना इनरव्हील क्लब खोपोली तर्फे मेडिकल पाउच, बिस्कीट, इलेक्ट्रिक पाकीट व इतर साहित्य देण्यात आले ही वाहने मुळगाव, साजगाव, सावरोली, खालापूर, बिड, पळसदरी इथून निघाल्या होत्या.

यावेळी क्लबच्या अध्यक्ष दिना शहा, सेक्रेटरी मधुमिता पाटील, माजी अध्यक्ष जयश्री कलोसी, पीडीसी डॉ सावित्री रघुपती, पास्ट प्रेसिडेंट क्षमा आठवले, आयएसओ वर्षा शिवलकर, खजिनदार दीपिका कोठारी व सर्व सदस्य उपस्थित होत्या.





# माणगाव येथे मोहरम सण

**माणगाव : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यावर्षीही माणगावात मोहर्रम सण रविवारी पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या मोहर्रम सणानिमित्त माणगाव बाजारटेप मोहल्ला येथील मुस्लिम बांधवांनी ताबुताचे विसर्जन मिरवणूक वाजत-गाजत काढली होती. या वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

बकरी ईदनंतर २० दिवसांनी मोहर्रम इस्लामी महिना सुरू होतो. चंद्रदर्शन झाल्यावर त्या रात्रीपासून मोहर्रम सणानिमित्त शहीद हसन व हुसैन यांच्यावर आधारित चरित्राचे वाचन मजलीसच्या निमित्ताने मुस्लिम बांधव करीत असतात. हा महिना तसा दुःखाचा मानला जातो, परंतु गेली अनेक वर्षापासून पारंपरिक पद्धतीने ताबुत काढून वाजत गाजत काही मुस्लिम बांधव हा मोहरम सण साजरा करीत असतात.

यावर्षीही माणगाव नगरपंचायत हद्दीतील बाजारटेप मोहल्ला येथे रविवारी दुपारनंतर मुस्लिम बांधवांनी ताबुताची विसर्जन मिरवणूक काढून हा ताबूत दारोदारी नेऊन मुस्लिम बांधवांबरोबरच हिंदू बांधवांनी त्याचे दर्शन घेतले. सायंकाळी या ताबुताचे माणगाव काळ नदीत उत्साहात विसर्जन करण्यात आले.



# पतसंस्थेतर्फे विद्यार्थी गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**



सहकार क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल ता. माणगाव या संस्थेतर्फे सन. २०२४- २५ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदविका, शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासद पाल्यांचा (विद्यार्थ्यांचा) गुणगौरव सोहळा शनिवारी झाला.

संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगाव या ठिकाणी संस्थेचे चेअरमन आनंद यादव तसेच संचालक दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, उदय म्हशीलकर, संदीप खरंगटे, दिप्ती मोरे, मनीषा राजपूत यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत तसेच संस्थेचे सभासद, खातेदार, हितचिंतक, व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, सर्व कर्मचारीवृंद, पालकवर्ग, स्वल्पबचत प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी आपल्या मनोगतात गुणगौरव सोहळ्यास उपस्थित असलेल्या विध्यार्थी व पालकवर्ग यांचे स्वागत करून संस्थेच्या प्रगतीचा आलेख उपस्थित सर्वांसमोर ठेवीत यापुढे आपण विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाल्यास मोठ्या प्रमाणात एका प्रशस्त हॉलमध्ये गुणगौरव सोहळा कार्यक्रम घेऊ असे सांगत सर्व गुणवंत विध्यार्थ्यांना संस्थेतर्फे शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे संचालक दिलीप जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी व्यवस्थापक पुंडलीलक गायकवाड, सर्व कर्मचारी वर्ग व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.

# महिला बचत गटांना अधिकाधिक प्रोत्साहन देणार -ना. आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

बचत गटाच्या चळवळीत उमेदचे काम अभिमानास्पद आहे.उमेदचे काम उल्लेखनीय काम आहे. उमेदच्या बचत गटांना अधिका अधिक प्रोत्साहन देण्याचे काम आम्ही केले आहे. महीला बचतगटांनी गणपती, नवरात्र, दिपावली, हे सण लक्षात घेवुन उत्पादन काढल्यास चांगला नफा मिळेल. उमेदच्या मार्गदर्शनाखाली महीला बचत गटांना मार्गदर्शन देण्यात येईल. तुम्हाला आज मिळत असलेल्या

कर्जाचे चांगले नियोजन बचत गटांनी करावे.कर्जाचा उपयोग उत्पादन वाढविण्यासाठी महीला बचत गटांनी करावे असे प्रतिपादन महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी केले. तर राज्यात दोन कोटी ४७ लक्ष महीलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनाचा लाभ मिळाला असल्याचे आवर्जून सांगितले.



रोहा तालुक्यातील उमेदच्या महीला बचत गटांना बॅक कर्ज धनादेश वाटप प्रसंगी पंचायत समितीच्या कै.दत्ताजीराव गणपत तटकरे साभागृहात महीला बचत गटाच्या महीलांना मार्गदर्शन करताना ना.आदिती तटकरे बोलत होत्या.

यावेळी जिल्हा अधिकारी किसन जावळे, मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, गटविकास अधिकारी सुभदा पाटील, माजी सभापती रामचंद्र सकपाळ, समिर शेडगे, प्रितम पाटील, अमित ईकडे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, चंद्रकांत पार्टे, विस्तार अधिकारी महारुद्र फडतरे, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, जयवंत मुंढे, स्वप्नील धनावडे आदी उपस्थित होते.

यावेळी रोहा तालुक्यातील बचत गटांना विविध बँकाकडुन कर्जाचे धनादेश ना. आदिती तटकरे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. सुत्रसंचलन जयेश भोईर यांनी तर आभार विस्तार अधिकारी महारुद्र फडतरे यांनी मानले.

# खालापूर पोलीस ठाण्यात आरोग्य तपासणी शिबिर

**खालापूर : प्रतिनिधी**

सहाय्यक फौजदार स्वर्गीय महेश मधुकर कळमकर यांच्या पाचव्या स्मृतिपित्यर्थ पोलीस कर्मचारी, वनविभाग, तहसील कर्मचारी यांच्याकरता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन खालापूर पोलीस ठाणे येथे करण्यात आले होते. दिलासा फाउंडेशन खालापूर आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पातळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीर घेण्यात आले.

खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, महिला पोलीस उपनिरीक्षक शामल पाटील, खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, खोपोली विधी महा विद्यालयाचे अध्यक्ष नरेंद्र शहा, नगरसेविका शिवानी जंगम इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा क्षमा आठवले, निवृत्त पोलीस अधिकारी सुरेंद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. दिलासा फाउंडेशन राबवत असलेल्या विविध उपक्रमाचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी कौतुक करत शिबिराच्या आयोजन केल्याबद्दल आभार मानले.

नगरसेविका शिवानी जंगम यांनी कोरोना काळात कर्तव्य बजावताना प्राण गमावलेला सहाय्यक फौजदार महेश कळमकर यांच्या आठवणी विविध सामाजिक उपक्रमातून सतत जागवल्या जात असल्याचे सांगितले. स्वर्गीय महेश कळमकर यांच्या समवेत नोकरी केलेले माजी पोलीस अधिकारी सुरेंद्र कुलकर्णी यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ५० जणांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. शिबिरासाठी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पातळगंगाचे डॉ. रणजीत खंदारे, निलेश अस्मार दिलासा फाउंडेशनचे अध्यक्ष मनोज कळमकर, नितीन बोंदार्डे, प्रणित कळमकर, साहिल सावंत, पत्रकार प्रसाद अटक, दत्ता शेडगे, दिनेश पाटील यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची प्रस्तावना उमेश विचारे यांनी केली तर आभार सुरेंद्र कुलकर्णी यांनी मानले.



# भारताचा ऐतिहासिक कसोटी विजय

## ‘डब्ल्यूटीसी’च्या नवीन चक्रात उघडले खाते; संयुक्तपणे तिसऱ्या स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने रविवारी दिमाखदार विजय मिळवला. या विजयामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) च्या २०२५-२७ या नवीन चक्रात टीम इंडियाने आपले खाते उघडले आहे. इंग्लंडचा तब्बल ३३६ धावांनी पराभव करत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. विशेष म्हणजे बर्मिंगहॅममध्ये भारताने प्रथमच विजय मिळवला आहे.



दुसऱ्या कसोटी सामन्यातील विजयासह भारतीय संघ २०२५-२७च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर पोहचला आहे. संघाला एका स्थानाचा फायदा झाला आहे. सध्याच्या जागतिक कसोटी स्पर्धेच्या चक्रात भारतीय संघाने आतापर्यंत एकूण दोन सामने खेळले. यातील एक जिंकला आहे आणि एक गमावला आहे. त्याचा पीसीटी ५० टक्के आहे, तर इंग्लंडला सामना गमावल्यामुळे पराभव सहन करावा लागला आहे आणि तो दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. २०२५-२७च्या जागतिक कसोटी सामन्यात त्यांनी एकूण दोन सामने खेळले आहेत, ज्यामध्ये एक पराभव झाला आहे आणि एक जिंकला आहे. त्याचा पीसीटी ५० टक्के आहे. भारत आणि इंग्लंडचा पीसीटी समान आहे. अशा परिस्थितीत आपण असे म्हणू शकतो की, दोन्ही संघ समान आहेत आणि संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहेत.

भारताने पहिल्या डावात ५८७ धावा केल्या होत्या आणि इंग्लंडला ४०७ धावांवर गुंडाळून १८० धावांची मोठी आघाडी घेतली होती. शुबमन गिलच्या शतकाच्या मदतीने भारताने दुसरा डाव ६ बाद ४२७ धावांवर घोषित केला आणि ६०७ धावांची एकूण आघाडी मिळवून इंग्लंडसमोर ६०८ धावांचे लक्ष्य ठेवले. पाचव्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव २७१ धावांवर सर्वबाद झाला आणि भारताने इंग्लंडचा तब्बल ३३६ धावांनी पराभव केला.

पाचव्या दिवसाचा खेळ पावसामुळे उशिरा सुरू झाला, परंतु यानंतर वेगवान गोलंदाज आकाश दीपने सुरुवातीला इंग्लंडला दोन धक्के दिले. बेन स्टोक्सने जेमी स्मिथबरोबर सहाव्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी केली. स्टोक्सला तंबूत धाडत वॉशिंग्टन सुंदरने ही भागीदारी मोडली. लंच ब्रेकनंतर भारताने उर्वरित चार विकेट घेत दिमाखदार विजयाची नोंद केली. भारताकडून वेगवान गोलंदाज आकाश दीपने कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली आणि दुसऱ्या डावात सहा विकेट घेतल्या. आकाशने पहिल्या डावात चार विकेट घेतल्या होत्या. आकाश व्यतिरिक्त मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

दुसऱ्या सत्रात इंग्लंडने ख्रिस वोक्स (७), जेमी स्मिथ (८८), जोश टंग (२) आणि ब्रायडन कार्स (३८) यांच्या विकेट्स गमावल्या. शोएब बशीर १२ धावा काढून नाबाद परतला. इंग्लंडकडून दुसऱ्या डावात यष्टीरक्षक फलंदाज जेम स्मिथने शानदार कामगिरी केली आणि अर्धशतक झळकावले. भारत आणि इंग्लंडमधील तिसरा कसोटी सामना १० जुलैपासून लॉर्ड्सच्या मैदानावर खेळवला जाणार आहे.

# आकाश दीपने मोडला ३९ वर्षांपूर्वीचा विक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये दुसरा कसोटी सामना एजबस्टनमध्ये रंगला. भारतीय संघाने हा सामना जिंकण्यासाठी इंग्लंडसमोर ६०८ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या धावांचा बचाव करताना भारतीय संघाकडून आकाश दीपने सर्वाधिक सहा गडी बाद केले. आकाश दीपने या सामन्यातील पहिल्या डावात चार गडी बाद केले होते. दरम्यान, दोन्ही डावात मिळून त्याने १८७ धावा खर्च करत १० गडी बाद केले. यादरम्यान त्याच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.

या सामन्यासाठी भारतीय संघातील वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला विश्रांती देण्यात आली होती. त्याच्या जागी आकाश दीपचा प्लेइंग ११मध्ये समावेश करण्यात आला. बुमराहची जागा भरणे कठीण आहे, पण आकाश दीपने असा काही कारनामा करून दाखवला, जो येणारे कित्येक वर्ष लक्षात ठेवला जाईल. त्याने इंग्लंडमध्ये कसोटी क्रिकेटमध्ये गोलंदाजी करताना सर्वोत्तम कामगिरी करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

आकाश दीपने ४१.१ षटक गोलंदाजी केली. यादरम्यान त्याने १८७ धावा खर्च केल्या आणि १० गडी बाद केले. याआधी इंग्लंडमध्ये गोलंदाजीत सर्वोत्तम कामगिरी करण्याचा रेकॉर्ड हा चेतन शर्मा यांच्या नावावर होता. शर्मा यांनी इंग्लंडमध्ये १९८६मध्ये गोलंदाजी करताना एका कसोटी सामन्यात ५३.३ षटक गोलंदाजी करत १८८ धावा खर्च करून १० गडी बाद केले होते. आता ३९ वर्षांनंतर आकाश दीपने त्यांचा हा रेकॉर्ड मोडला आहे.

# सिराज आणि आकाश दीपमुळे काम सोपे झाले : कर्णधार गिल

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय कर्णधार शुभमन गिलने बर्मिंगहॅमच्या एजबस्टन टेस्टमध्ये ऐतिहासिक विजयानंतर मोहम्मद सिराज आणि आकाश दीपच्या जोरदार कामगिरीचे कौतुक केले आहे. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत या दोघांनी मिळून एकूण १७ बळी घेतले. गिलने सांगितले की, त्यांच्या कामगिरीमुळे कर्णधार म्हणून त्याच काम खूपच सोपे झाले.



आकाश दीपने या सामन्यात एकूण १० बळी घेतले, ज्यात दुसऱ्या डावात त्याने कारकिर्दीतील पहिल्यांदाच पाच बळी घेतले. सिराजने दोन्ही डाव मिळून सात बळी घेतले. सामन्यानंतर चेतेश्वर पुजारासोबत संवाद साधताना गिल म्हणाला, जेव्हा तुमचे दोन वेगवान गोलंदाज १७ विकेट घेतात, तेव्हा कर्णधारासाठी गोष्टी खूपच सोप्या होतात. बुमराह या सामन्यात नव्हते, पण आपल्या संघात असे गोलंदाज आहेत, जे एका सामन्यात २० बळी घेऊ शकतात.

पहिल्या टेस्टमध्ये झालेल्या पराभवानंतर गिलने या शानदार पुनरागमनाचे श्रेय उत्कृष्ट गोलंदाजी आणि अचूक क्षेत्ररक्षणाला दिले. गिल म्हणाला, असं अनेक वेळा झालं आहे की आपण मालिकेतील पहिला सामना हरलो आणि नंतर जोरदार पुनरागमन केले. त्यामुळे आम्हाला माहीत होते की कसे परत यायचे. जर आपण सातत्याने ४५० धावा केल्या, तर आपल्या गोलंदाजांकडे सामना वळवण्याची ताकद आहे.

गिल पुढे म्हणाला, माझ्या मते ज्या प्रकारे आपण गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात पुनरागमन केले ते खरोखर विशेष होते. प्रत्येक सामना हेडिंग्लेसारखा नसतो. आपल्या गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. गिलने प्रसिद्ध कृष्णाचेही कौतुक केले. त्याने फारसे बळी न घेताही दबाव कायम ठेवला. आकाश दीपने अचूक लेंथवर मारा केला, जे अशा पिचवर खूप अवघड होते. त्याने आमच्यासाठी जबरदस्त खेळी केली. मी माझ्या खेळासोबत निश्चितच सध्या खूप कम्फर्टेबल आहे. शेवटी गिलने सांगितले की, बुमराह लॉर्ड्समध्ये होणाऱ्या तिसऱ्या टेस्टसाठी सज्ज असेल.

# आफ्रिकेच्या वियान मुल्डरची अविश्वसनीय त्रिशतकी खेळी

**बुलवायो : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे. या दौऱ्यातून संघातील प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचे नेतृत्व केशव महाराजने केले, तर तो दुखापतग्रस्त झाल्याने दुसऱ्या सामन्यात ही जबाबदारी वियान मुल्डरकडे सोपवली गेली. त्याने कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात त्रिशतकी खेळी करण्याचा ऐतिहासिक कारनामा केला आहे.

कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात या पठ्ठ्याने असे काही करून दाखवले आहे, जे कसोटी क्रिकेटच्या १५० वर्षांच्या इतिहासात कोणालाच जमले नव्हते. झिम्बाब्वेविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीत मुल्डरने २९७ चेंडूंचा सामना करत आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिले त्रिशतक झळकावले आहे. यासह



तो कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात त्रिशतकी खेळी करणारा पहिलाच कर्णधार ठरला आहे. याआधी कुठल्याही कर्णधाराला आपल्या पहिल्याच सामन्यात असा कारनामा करता आलेला नाही. त्याला वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लारा याचा ४०० धावांचा विक्रम मोडण्याची संधी होती, पण आफ्रिकेने डाव घोषित केला.

वियान मुल्डर हा दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू आहे. त्याने वेगवान गोलंदाज म्हणून संघात स्थान मिळवले. म्हणून आठव्या क्रमांकाला फलंदाजीला येणारा गोलंदाज अशी त्याची ओळख, पण त्याचे फलंदाजीतील कौशल्य पाहून त्याला ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवले. पहिल्या सामन्यात त्याने ४४ चेंडू खेळून काढले व ६ धावा केल्या. दुसऱ्या डावात मुल्डरने ५० चेंडूंचा सामना करत त्याने २७ धावांची खेळी केली होती.

# विराट कोहलीकडून शुबमन गिलसह सिराज आणि आकाश दीपचे कौतुक


**नवी दिल्ली** : पहिल्या सामन्यातील पराभव विसरून दमदार पुनरागमन केलेल्या भारतीय संघाने दुसऱ्या कसोटीत यजमान इंग्लंडचा तब्बल ३३६ धावांनी दारूण पराभव केला. पहिल्यांदाच भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपदाची जबाबदारी खांद्यावर घेतलेला शुबमन गिल भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला. शुबमनची उल्लेखनीय कामगिरी पाहून भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली हादेखील त्याचे कौतुक करण्यापासून स्वत: रोखू शकला नाही. त्याने गिलसह मोहम्मद सिराज आणि युवा गोलंदाज आकाश दीप यांचे कौतुक केले.




# जसप्रीत बुमराहचा मिस्ट्री गर्लबरोबरचा फोटो व्हायरल

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचा उत्कृष्ट वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुसऱ्या कसोटी सामन्यात वर्कलोड मॅनेजमेंटमुळे खेळत नाहीये, पण बुमराहचा मिस्ट्री गर्लबरोबरचा ड्रेसिंग रूममधील फोटो व्हायरल होत आहे. ही मिस्ट्री गर्ल नेमकी कोण, असा सर्वांना प्रश्न पडला आहे.



ड्रेसिंग रूममधील या व्हायरल फोटोमध्ये ही मिस्ट्री गर्ल बुमराहला न्याहाळताना दिसत आहे, तर बुमराह सामना पाहतोय असे दिसतेय. भारत-इंग्लंड कसोटी सामना असतानाचा हा फोटो आहे.या मिस्ट्री गर्लने भारताच्या इतर कोचिंग स्टाफप्रमाणे भारताची जर्सीदेखील घातली आहे. त्यामुळे भारताच्या ड्रेसिंग रूममध्ये अचानक ही मिस्ट्री गर्ल का आली, याचे उत्तर मिळाले आहे.

पहिल्या डावात इंग्लंडच्या डावातील २६व्या षटकानंतरचा हा फोटो आहे. भारताच्या ड्रेसिंग रूममधील या मिस्ट्री गर्लचे नाव यास्मिन बदियानी असल्याचे उघड झाले आहे. यास्मिन ही इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाच्या ऑपरेशन्स विभागातील आहे. मिळालेल्या माहितीनुसार इंग्लंड क्रिकेट बोर्डाने दौऱ्यावर आलेल्या भारतीय संघाशी समन्वय साधण्यासाठी तिची विशेष नियुक्ती केली आहे. त्यामुळेच यास्मीन भारताच्या ट्रेनिंग जर्सीमध्ये दिसली.

ट्रेनिंगचे शेड्युलिंग, लॉजिस्टिक्स आणि इतर गोष्टींचे व्यवस्थापन करणं हा यास्मीनच्या कामाचा भाग आहे. यास्मीनच्या लिंक्डन प्रोफाईलवरील माहितीनुसार ती यापूर्वी फिझ लिमिटेड आणि ओआरएस स्पोर्ट्स यासारख्या कंपन्यांमध्ये हेड ऑफ स्पोर्ट्स पदावर कार्यरत होती तसेच लेस्टर सिटी या प्रसिद्ध फुटबॉल क्लबमध्ये स्पोर्ट्स फिजिओथेरिपिस्ट म्हणून २०१० ते २०१३ यादरम्यान कार्यरत होती.

# शुभांगी घुलेची आता रौप्यपदकाला गवसणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलातील महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांनी अमेरिकेतील अल्बामा येथे झालेल्या २१व्या जागतिक पोलीस व अग्निशमन स्पर्धेत आणखी एक यश प्राप्त केले आहे. त्यांनी फायर स्टेअर रेस सांघिक गटात रौप्यपदक पटकावले.

याच स्पर्धेत मागील आठवड्यात अल्टिमेट फायर फायटिंग चॅलेंज या खेळात शुभांगी यांनी कांस्यपदक मिळवले होते. आता त्यांनी फायर स्टेअर रेसमध्ये सांघिक रौप्यपदक मिळवले आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ५०पेक्षा अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

रौप्यपदक जिंकल्याबद्दल पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी शुभांगीसारख्या कर्मचारीवर्गामुळे महापालिकेचा गौरव वाढतो आहे, अशा शब्दांत कौतुक केले. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही अभिनंदन केले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com